

श्री सद्गुरु आत्मानंद सरस्वती
तथा

# श्री रंगनाथ महाराज

## न्हावा, ता. जालना

यांचे ओविबद्ध चरित्र

* लेखक *

कै. वासुदेवराव देव महाराज
(टेंभूर्णीकर)

लेखक

**ह.भ.प. श्री वासुदेवराव देव महाराज**
**टेंभुर्णीकर**

श्री आत्मानंद सरस्वती महाराज

**(पुर्वाश्रमीचे रंगनाथ महाराज)**

विश्रांती मठ न्हावा

**।।श्री जगदंब समर्थ ।।**

## प्रस्तावना :-

माझे परम् पुज्य सद्‌गुरू श्री. वासुदेवराव महाराज देव उर्फ तात्यासाहेब टेंभुरणीकर यांनी श्रीमत परमहंस आत्मानंद सरस्वती तथा (रंगनाथ महाराज) संस्थान विश्रांती मठ न्हावा ता. जालना यांचे ओवीबद्ध चरित्र, लिहून त्यावर मी प्रस्तावना लीहावी अशी आज्ञा केली. ही त्यांची आज्ञा ऐकून प्रथम मी गोंधळूनच गेलो. परंतु पुन्हा विचार केला की प्रत्यक्ष गुरूमाऊलीचीच ही आज्ञा, मग त्यांचेच स्मरण करून व त्यांचीच मुर्ती ह्रदय मंदीरात साठऊन तेच जसे बुद्धिला प्रेरीत करतील तसे चार शब्द लीहून काढावे व त्यांचे आज्ञेचे पालन करावे असा मी निर्धार केला. महाराजांची ही आज्ञा कांही नवीन आहे असे नाही. प्रत्यक्ष महर्षि व्यासानी आपला शिष्य जैमिनी यांस आपले लिखाण (उत्तर मिमांसा शास्त्र) तपासण्यास आज्ञा केली होती नाथ महाराजांनी तर आपला शिष्य गांवबा (अक्षरशुन्य) याला आज्ञा करून भावार्थ रामायण हा ग्रंथ पूर्ण करून घेतला. असा हा पूर्व इतिहास पाहिल्यास त्यांनी कलेल्या आज्ञेची पूर्तता तेच करून घेतील. मग चिंतेचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

प्रस्तुत हा ओवीबद्ध ग्रंथ एकंदर सात अध्यायांत लिहिला असून ओ. रंगनाथ महाराज यांच्या जन्मापासून समाधी काळपर्यन्तचा इतिहास थोडक्यात पण पूर्ण ग्रंथीत केला आहे. देव महाराज हे अत्यंत आधीकारी असून सिद्ध हस्तलेखक म्हणून त्यांचा फार मोठा नांव लौकिक आहे, हे निराळे सांगण्याची गरज नाही. आतापर्यन्त त्यांनी कितीतरी संतांची चरित्रे लीहून प्रकाशित केली

आहेत. ह.भ.प. श्री संत दासगणू महाराजांचे नंतर जवळ जवळ सर्वच संतांची चरित्रे त्यांच्या आधिकारी लेखणीतून बाहेर पडली आहेत. त्या प्रत्येक ग्रंथावर मोठमोठया आधिकारी लोकाने प्रस्तावना लिहून देव महाराजांचा फार मोठा गौरव केलेला आहे.

देव महाराजांची वृत्ती अतिशय निस्पृह व अभिमान रहित असल्यानें त्यांच्या कोणत्याही लिखाणामध्ये दैवी सामर्थ्य असल्याचे प्रत्ययास आल्यावाचून राहात नाही. महाराजांची लीहीण्याची शैली फार साधी व सखोल असुनही सामान्य माणसासहि सहज समजण्यासारखी असते.

प्रस्तुत ग्रंथांचे लिखाण अतिशय रसाळ व रसभरीत असून रंगनाथ महाराजांचे जीतके कांही चमत्कार वर्णीले आहेत ते संक्षीप्तच पण कीती उद्बोदक आहेत. याचा प्रत्यय वाचकास आल्यावाचून राहणार नाही.

आता ह्या ग्रंथाची पूर्णता होण्यामागे थोडा इतिहास आहे, तो वाचकवृन्दाकरीता देत आहो या वरून देव महाराज जसे इतरत्र सांगतात तसे ते प्रत्यक्ष आचरणात कसे आणतात हे सिद्ध होण्यासारखे आहे यत्र नार्यस्तु पुज्यते रमते नत्रदेवत: ।। या शास्त्रवचनानुसार ह्या ग्रंथाची पुर्तता केवळ त्यांनी आपली प्रीय पत्नी आमुची गुरूमाय (पतीलोकवासी सौ. सुलोचनाबाई देव) वांच्या वचनाकरीता केली आहे याचा संकेत देव महाराजांनी आपल्या निवेदनांतही केला आहे. परंतु सुदैवाची गोष्ट की ग्रंथाचे प्रकाशन आई साहेबाचे समक्ष होऊ शकले नाही.

तरी पण ही त्यांचीच स्मृती आहे. असे म्हणण्यांत अतिशयोक्ती होणार नाही. अस्तु.

देव महाराजांचा शिष्यवृन्द फार मोठा आहे. आणि प्रस्तावना लीहण्याची आज्ञा मलाचे केली यांत मी माझ मोठे भाग्य समजतो. त्यांचे हे कृपाछत्र आम्हा सर्वच शिष्यवृन्दावर सदोदित असावे, असे त्या प्रभुचरणी प्रार्थना करून व श्री. रंगनाथ महाराज (चरित्र नायक) यांचे चरणकमली मस्तक ठेऊन माझी ही प्रस्तावना येथेच संपवितो.

**आपले**
**देव परिवार**

**समाप्त**

## ।। श्री नृसिंह समर्थ ।।

## निवेदन :-

श्रीमत् परमहंस आत्मानंद सरस्वती (श्री. रंगनाथ महाराज) संस्थान विश्रांती मठ न्हावा यांचे ओवीबद्ध चरित्र आज समस्त सद्भक्तांचे हाती देतांना मला अत्यानंद होत आहे. बऱ्याच दिवसापासून हे चरित्र मी लीहावे असा पुष्कळांचा अग्राह होता. परंतु काय कारण असेल ते असो मी ते टाळितच गेलो. याचे कारण एक तर यापुर्वी महाराजांचे चरित्र गद्य रूपांत त्यांचे भक्तांनी लिहून प्रकाशितही केले आहे. त्यांत श्री. अंकुशकर व श्री. गव्हाणकर बंधु यांचा उल्लेख प्रामुख्याने करीता येईल. व वरील दोन्ही लेखक आधिकारी असून महाराजांचे महान भक्त आहेत. इत्यादी.

एकदां विश्रांती मठावर महाराजांच्या पुण्यतीथीस जाण्याचा सहज सुयोग घडून आला. तेथेही अनेकांनी महाराजांची ओवीबद्ध पोथी असावी व आपण ती लिहा असा एकच सूर धरीला त्यांत प्रामुख्याने बाळकृष्ण यज्ञेश्वर पाठक टेंभूर्णी यांनी विशेष आग्रह धरून वेळोवेळी सुचनाही करीत राहीले. तरीपण ही गोष्ट माझ्या लक्षांत येईना. कारण माझ्यापुढे प्रश्न होता. (प्रकाशन खर्चाचा)

माझी अशा प्रकारची विपत्ती अवस्था पाहून खरोखर विपतौ बुद्धिदात्रीच वा भार्या मीत्रं गृहेषुच या उक्तीप्रमाणें मला अनुभव यावा कीं काय? म्हणून माझ्या धर्मपत्नीनेंच मला सहज प्रश्न केला आता पर्यन्त जे ग्रंथ प्रकाशित झाले तो खर्च कोणी केला? ह्या एकाच प्रश्नानें माझे अज्ञान

मला कळून चुकले. की आपण फक्त आपले कर्तव्य निरपेक्ष बुद्धीनें करावे आतापर्यन्त चा प्रकाशन खर्च जसा सहजासहजी त्या ईशकृपेने झाला तसा हाही होईलच. आणि तसे ते उशीरा का होईना पण घडून आले. हे सत्य माझा वडील मुलगा (डॉ. प्रभाकरराव देव) व्हेटरनरी दवाखाना रांजनी येथे जेव्हा बदलून गेला तेंव्हा मलाही सहजच तेथे जाण्याचा योग आला. व तेथील प्रतीष्ठीत व अध्यात्मिक ज्ञानावर प्रभुत्व असलेले महान हरीभक्त श्री नारायणराव गोविंदराव देशमुख याचा व माझा दाट परिचय होऊन ओघाओघानेंच प्रस्तुत चरित्राचे प्रकाशनाचा प्रश्न निघाला. तेंव्हा श्री देशमुख यांनी स्वत: मला बरोबर घेऊन वझर येथील श्री रंगनाथ महाराजावर अतिशय निष्ठा असलेले. श्री. दिगंबरराव, श्री. दत्तोपंत, श्री विश्वनाथराव (सराटे बंधु)यांची भेट करविली. व लागलीच या बंधूवर्गानी ग्रंथ प्रकाशन खर्चाची हमी घेऊन ग्रंथ प्रकाशित करविला. ह्या घराण्यावर श्री. रंगनाथ महाराजांची अत्यंत कृपा असून ह्या तीन्ही बंधुवर्गाचीहि महाराजावर पूर्ण श्रद्धा आहे. संसारात अशी वृत्ती होऊन संत सेवा घडणें फार कठीण आहे. त्याला पूर्व सुकृत पाहिजे कारण संतसेवेची फलश्रुती ही फार मोठी आहे. हे शास्त्रसंमतच आहे. (ओवी - संतसेवा घडे जयाप्रती । पूर्वज तयाचे ते उद्धरती । एशीं असे ती शास्त्रोक्ति ।। सत्य सत्य त्रिवाचा ।।

मी सेवा निवृत्त झाल्यापासून माझ्या ह्या कामात अनेक व्यक्तिनी अनेक प्रकारे संत वाङमय प्रकाशनार्थ म्हणून पुष्कळच साह्य केले. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. आता सर्वांचाच उल्लेख जरी मला येथे करिता आला नाही तरी पण इतर प्रकाशनाकरीता म्हणून ज्यांनी

मला मदत केली. त्यांचा नामनिर्देश येथे केल्यावाचून राहवत नाही.

श्रीमत् परमहंस स्वरूपानंद महाराज विश्रांती मठ (१०० रू.) श्री. देविदासराव कुळकर्णी सेलगांव (१०१ रू.) श्री. सदाशिवराव देशपांडे वकील अंबडकर (१०१ रू.) श्री. रामराव कुळकर्णी वडीलाची स्मृती म्हणून (२५ रू.) श्री विवेकानंद महाराज यांनी मातोश्री जमनाबाई ची स्मृती म्हणून (११ रू.) रखमाबाई सेविका (दुलीचंद काका) हीनें (११ रू.) श्री गणेश मन्साराम बांगड गोलटगांवकर टेंभूर्णी (२१ रू.) श्री. पुन्डलीकराव भोपळे इन्स्पेक्टर (आमुचे शिष्य) (११ रू.) श्री. त्रिंबकराव रघुनाथराव देशपांडे रोषनगांव (११ रू.) कुमारी मिनाक्षी बाई आठल्ये (११ रू.) या सर्वांचाच मी आभारी आहे.

आता काही व्यक्ती अशा आहेत की त्यांचेकडून माझ्या कामांत नेंहमीच मदत होते त्यांत प्रामुख्याने श्रीमान् रायकीशनप्रसाद साहेब टंडण, श्रीमान् कचरदासजी सेट बाकळीवाले, श्री. मोतीलालजी, श्री. बद्रीनारायणसेट तोतळे बीडकीन, श्री. जयाजी पाटील गेवराई कुबरी, श्री नानासाहेब देशपांडे जाफ्राबाद, चेचाणी घराण्यातील श्री. चुन्नीलालजी, श्री. रामनारायणजी, श्री. लक्ष्मीनारायणजी (आमुचे शिष्य) व श्री. गंगाधरराव घन सेलगांवकर, श्रीमान् राजाभाऊ साहेब देशपांडे बाळापूरकर जाफराबाद श्री. नारायण केशवराव देशपांडे ॲडव्होकेट श्री. पन्नालालजी तापडे श्री. बाबुराव खोकले देऊळगांव राजा, श्री माणीकराव पाटील वझर व सराटे मंडळी इ.

प्रेसमध्यें या तीनच दिवसांत काम पूर्ण होईल असे मला वाटत नव्हते. परंतु कम्पोझिटर

श्री. रमेश गुळस्कर देऊळगांव-राजा यांनी ते काम चिकाटीनें पूर्ण करून दाखविले याबद्दल समाधान मानावे तीतके थोडेच आहे. आणि प्रेसमालकाचा स्वभावहि परमार्थी असल्यानें वेळेंवर काम करून घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानणे अयोग्य नाही.

आता शेष राहीलेले आयुष्य असेच संत सेवेत व्यतीत होत राहो ही त्या श्रीहरी चरणीं प्रार्थना करून माझे हे निवेदन मी येथे संपवितो. प्रस्तावना लेखक व पुरस्करतें हे उभयताहि माझे सत् शिष्य असल्यानें मनस्वी समाधान वाटते.

नोट :- शुद्धीपत्र दिले आहे त्याप्रमाणें प्रत शुद्ध करूनच वाचकांनी वाचन करावे ही नम्र प्रार्थना आहे.

**संतचरणरज,**
**वासुदेवराव लक्ष्मणराव देव**
**टेंभूर्णीकर**

**समाप्त**

श्री गणेशायनम: ।। श्री सरस्वत्यैनम: ।। श्री गोपाळ कृष्णायनम: ।। जय जयाजी रूख्मिणी कांता ।। निज भक्त रक्षका पंढरीनाथा ।। यदुकूलभूषणा वासुदेवसुता ।। कृष्णा विष्णो जगद्गुरो ।।१।। लीलावतारी तूं जगन्नाथ ।। ब्रम्हादिकाही न कळे तुझा अंत ।। कार्यपुर्ती व्हावया ते अधिष्ठान सतत ।। तुझेची असावे सर्वदा ।।२।। गारजे लागी देऊनी वरदान ।। पोटी आलासी तू जगज्जीवन ।। नामे जहालासी तू गजवदन ।। मंगलाकारक सर्वदा ।।३।। देव गंधर्वादि ऋषीगण ।। कार्यसिद्धी तो व्हावया लागून ।। प्रथमारंभी ते येऊनी शरण ।। चरण तुझेची वंदिती ।।४।। तुझी आठवण होता मनी ।। विघ्ने पळती रानोरानीं ।। यालागी काया वाचा मनें करूनी ।। शरण तुज मी आलोसे ।।५।। मी तो असे बुद्धिहीन ।। नसे भक्ति नाते ज्ञान ।। संत चरित्र ते लीहावे म्हणून ।। ठाण मांडूनी बैसलो ।।६।। तू विद्येचा असशी सागर ।। शरण आलो मी तुज पामर ।। मस्तकी ठेवी कृपाकर ।। पाठी राखोनी विघ्नेशा ।।७।। तुझी कृपा ती जाहलीया जाण ।। मग करीन मी ग्रंथाचे लेखन ।। येरव्ही शब्दहि न बोलवे मज लागूण काही केल्याची सर्वथा ।।८।। जरी मृदंग ठेविला आणोनी ।। परी त्या वाजविता पाहिजे कोणी ।। तैसा तू माझीये अंतरी बैसुनी ।। ग्रंथ बोलवी दयाळा ।।९।। तुझ घेऊनीया आशिर्वचन आता वंदीन सरस्वती लागून ।। माये तू मजलागी होऊनी प्रसन्न ।। कृपा दृष्टि रक्षिका ।।१०।। तू सकळविद्येची स्वामीनी ।। व्यास वाल्मीकादी नारदमुनी ।। नित्य प्रार्थीती तुजलागुनी ।। आदिमाये सरस्वती ।।११।। तरी तू जिव्हाग्री राहून ।। रसाळ करवी ग्रंथ लेखन ।। तू जननी मी बालक पूर्ण ।। कृपे ओसगा घेईका

।।१२।। तुझा वरद हस्त असतां शिरी ।। मग लेखनाची असे ती काय थोरी ।। समर्थे अंगीकार केली यावरी ।। मग ठाव तोची तेशी असेना ।।१३।। मग आठऊनी कुल देवता ।। चरणी तयाच्या ठेविला माथा ।। नृसिंह अवतार प्रसिद्ध चवथा ।। भक्ता कारणेंचि जाहलासे ।।१४।। सत्य कराया भक्त वचन ।। स्तंभी प्रगटला न लागता क्षण ।। तैसेची तू पाठी राखून ।। ग्रंथ सिद्धी करावी ।।१५।। ज्याचे उदरी पावलो जनन ।। पिता माझा तो लक्ष्मण ।। माता सुन्दराबाई साध्वी जाण ।। प्रेमे वंदिली उभयता ।।१६।। काका साहेब परंपरेमाजी विख्यात ।। स्वामी माझा असो तो गुरू रंगनाथ ।। तैसे संत कवि कूलभूषण समस्त ।। वंदील अति प्रीतीनें ।।१७।। मी तो असे मंदमती ।। हे विदित आहे की तूम्हाप्रती ।। तरी मनीचे आर्त पुरवावया प्रीती ।। कृपा ती करावी सकळीकी ।।१८।। ऐसे प्रार्थुनी समस्ता ।। पुनरपी चरणी ठेविला माथा ।। तैसेची श्रोतया नमुनी तत्वता ।। म्हणे सादर श्रवणी असावे ।।१९।। या भरत खंडाचीये भितरी ।। संत उदया आले बहुतापरी ।। या जंबुद्विप पुण्यभुमीची थोरी ।। ब्रम्हादिकाही न वर्णवे ।।२०।। तेथे मी काय वर्णु पतीत ।। सूर्या पुढती जैसा का खद्योत ।। की पंडीता पुढे तो शेखी मिरवित ।। मुर्ख जैसा का बैसुनी ।।२१।। परी व्यास वसिष्ठादि नारद मुनी ।। सांगती पुराणी जें समस्ता लागुनी ।। तेची सांगेन मी तुम्हा आवर्जुनी ।। संशय न ठेवावा मानसीं ।।२२।। आणिक वदविता असे तो पंढरीनाथ ।। मी तो तयासी केवळ निमित्त ।। अंगे न बोलू शके काही किंचित ।। बोलविता आसे तो श्रीहरी ।।२३।। शुद्ध ते करावे कैसे भाषण ।। येवढेही ते मज नसे ज्ञान ।। तेथे या लेखनाचा

अभिमान ।। व्यर्थ कसया पाहिजे ।।२४।। असो भरता ऐसी पुण्य भूमी तत्वता ।। न दिसे कोठे त्रिभुवन धुंडीता ।। नाना अवतार संत भक्ताचे देखता ।। येथेचि जाहले आजवरी ।।२५।। निवृत्ती ज्ञानदेव भक्त सोपान ।। एकनाथ नामदेव आदिकरून ।। सावता खेचरादि स्वामी जनार्दन ।। येथेचि होऊनिया गेलेसे ।।२६।। ऐसे संत भक्त ते असंख्य असती ।। नामाभिधाने ती सांगावी किती ज्याचीया पदर जे ही समस्त क्षिती ।। पुण्य पावन जहालीसे ।।२७।। दक्षीण देशी जिल्ह्याचे ठिकाण ।। औरंगाबाद ऐसे ज्या म्हणती जन ।। त्यामाजी जालना शहर हे पुण्यपावन ।। विदीत असे की समस्त ।।२८।। सबंध जिल्ह्याचा हा परिसर पाहावा ।। पुण्य पावनचि वाटे तो समस्ता ।। बाळकृष्ण बनीमीयादि संत तत्वता ।। होऊनिया गेले ते येथेचि ।। या परंपरेमाजी विख्यात ।। औलीया थोर जहालासे श्री गुरू रंगनाथ ।। सर्वत्र संचार करूनी सतत ।। स्वस्वरूपी राहेचि सर्वदा ।।३०।। हाची आमुचा चरीत्र नायक ।। वेडा बावळा ज्या म्हणती सकळीक ।। परी असे हा पूर्ण अवतारी बाळक ।। नेंनती कोणी च अज्ञाने ।।३१।। आता होऊनीया सावधान ।। चरित्र तेची ऐकावे पुढे येथून ।। मुद्‌गल गोत्री सात्वीक ब्राम्हण ।। जालनापुरी त्या वस्तीस ।।३२।। चिमणाजी पंत ऐसे त्यां नामाभिधान ।। देशमुखी घराणें ते विख्यात पूर्ण ।। केशव राजाची ती उपासना करून ।। काल क्रमीत स्वानंदे ।।३३।। ब्रम्हचर्य अवस्थें माझारी ।। पंत आलेते वऱ्हाडाभितरी ।। मेहकरच्या त्या मार्गावरी ।। डोणगांवी येऊन राहीले ।।३४।। श्रीधर स्वामी महात्मा थोर ।। वस्थीस असे की तेथे साचार ।। पूर्व सुकृतेचि हा पंता निरंतर ।। सहवास लाभला स्वामीचा

।।३५।। नित्य होतसे पुराण श्रवण ।। स्वामी सेवा तैसे ते ध्यान मनन ।। वृत्ति जाहलीसे उदास पूर्ण ।। सत्संगेची त्या स्वामीच्या ।।३६।। अंतरमुख होताचि इंद्रिय गण ।। स्वामी चरणी ते स्थीरावले मन ।। म्हणें हो महाराजा कृपा करून ।। पावन मजसी करावे ।।३७।। अधिकार आणितो अवस्था पाहून ।। अनुग्रह दिधला तो पंता लागून ।। समाधी काळ पावेतो सेवा करून ।। पंत ते राहीले तेथेची ।।३८।। स्वामी ते समाधिस्त जहालिया वरी ।। मागुता आले जालनापुरी ।। गृहस्थाश्रमाची ती दिक्षा सत्वरी ।। स्वामी आज्ञेची घेतली ।।३९।। भागीर्थी नामे सुशील कांता ।। पंताशी ती लाधली पतीव्रता ।। यथा शास्त्र ती वर्तती उभयतां ।। संसारी दक्षता ठेवोनी ।।४०।। जमीन जुमला देशमुखी वतन ।। पंताच्या नांवे ती होती पुर्ण ।। अनुजाच्या नांवे ती अंगेची होऊन ।। करूनिया दिधली सर्वची ।।४१।। मग उषाधि रहीत जाहली यावर ।। नरसींगराव ते पाहती कारभार ।। पंत ते परमार्था मोकळे निरंतर ।। प्रपंचतो पाहे अनुज हा ।।४२।। नित्य स्नान संध्यादि ध्यान मनन ।। तैसेचि केशवराजाचे पुजा अर्चन । कोरान्न तशी ती भिक्षा करून ।। काल क्रमीती स्वानंदे ।।४३।। पुढे पुत्र तो जहाला पंता लागून ।। व्यंकटेश त्या ठेविले नामाभिधान ।। पुत्र तो होताची संसारी मन ।। उदास जाहले ते पंताचे ।।४४।। सद्‌गुरू ध्यास तों लागलासें मनी ।। म्हणती सार्थक ते व्हावे या नरदेहा येऊनी ।। या परी आठवतो नित्य होऊनी ।। गुरू स्मरण त्या सहज होतसे ।।४५।। ऐसी होताती पंताची स्थिती ।। अंतर्वत्नी ती जहाली भागिर्थी सती ।। तेज झळके ते मुखावरती ।। देहादि विसर पडलासे ।।४६।। पती पत्नीचा तो संवाद होता ।। वेदांत बोले ती

पतीव्रता ।। म्हणे नित्य निरंजन त्या सद्‌गुरूनाथा ।। ऐक्या भावेचि भजावे ।।५७।। सर्वत्र भरलासे सद्‌गुरू एक ।। त्याविण नसे ती वस्तु आणिक ।। ऐसा अंतरी तो करावा विवेक ।। तरीच सार्थक जन्माचे ।।४८।। जग हे विवर्त रूप पूर्ण ।। एक ब्रम्हची असे त्या अधिष्ठान ।। नाम रूपाशी ते सांडुनी आपण ।। अधिष्ठाना एकी पहावे ।।४९।। या परी ऐक कांतेचे बोल ।। पंता वाटे ते अंतरी नवल ।। म्हणे यथार्थ असे हे ब्रम्हांड सकळ ।। गुरू शब्दे निच सर्वदा ।।५०।। साध्वीचे बोल ते नित्य ऐकतां ।। उमज पडला तो चिमणाजी पंता ।। धन्य धन्य म्हणुनी त्या सद्‌गुरूनाथां ।। समाधिती लागे सहजची ।।५१।। असो भागिर्थीबाईचे ह्रदयरत्न ।। उदया पावले जैसे ते चंडकिरण ।। बालक दिसे तो दैदिप्यमान ।। अंजनिबाहु तैसाचि ।।५२।। शके सतराशे सत्तर ।। फाल्गुन मास दिवस तो सोमवार ।। शुद्ध एकादशी सुदीन साचार ।। जन्म दिवस हा बाळाचा ।।५३।। जन्मल्या दिवसा पासोनी बाळा ।। रडता देखीले नाही ते डोळा ।। जै नुरशहावली तेथे आला ।। बाळाशी त्या पहावया ।।५४।। तोची वलीच्या मांडीवरी बाळाशी दिधले ।। तयानीही त्याशी न्याहाळीले ।। न्याहाळीता सुक्ष्म दृष्टीनें पाहीले ।। तोची दृष्टादृष्ट जहाली ।।५५।। आश्चर्य चकीत तो वली जाहला ।। मग माईशी तो बोलू लागला ।। म्हणे मुलगा बालक म्हणु नये याला ।। दत्तावतार हा पूर्ण असें की ।।५६।। या वली म्हणून चुंबन घेतले ।। चुंबन घेताची मग त्या हसू आले ।। हसे संपता ते रडु लागले ।। आनंद तो सकळाशी जाहला ।।५७।। तोची मग बाळाशी स्तनी लाविता ।। पय ऽ पान तो करू लागला तत्वता ।। आनंदली ती माता पिता ।। नवल ऐसे

हे देखुनी ।।५८।। धन्य धन्य म्हणती नुरशहावली ।। प्रत्यक्ष देखिली ही गुरू माऊली ।। तो नुरशहा म्हणे दया ती तुमची जहाली ।। दत्त दर्शन आजी करविले ।।५९।। काय सांगु म्हण नवल ।। प्रत्यक्ष आनंदीस्वामीच दिसला तो मशीबाळ ।। मागुती यावली दत्त ऐसे बोलुनी बोल ।। निरोप घेतला तो शहाने ।। ६०।। नुरशहावली हें कोठील कोण ।। जरीका शंका उदेली श्रोतया लागून ।। तरी ऐकावे आता सावधान ।। जने विकल्प मानसी नुरेचि ।।६१।। आनंदी स्वामीच्या सहवासात असती अनेंक ।। त्या मधील नुरशहा हा अवलीया एक ।। स्वामी समाधिस्त होता तात्कालीक ।। गणेंश घटी तो येऊनी राहीला ।।६२।। समिपची एक दर्गा बांधुनी ।। ठेविलीसी यानें आपण लागुनी ।। ती खुण आद्यापी आहे पहावे नयनी ।। जरीका शंका असेल मानसीं ।।६३।। असो सतेज बालक हा ऐसा देखुनी ।। नांव ते ठेविले रंगनाथ म्हणुनी ।। बाळ वाढु लागला निशीदिनी ।। दिनमाने काळ तो लोटीता ।।६४।। अष्ट वर्षेती होताची वयाला ।। तो अवचितची येऊनी पडीलासे घाला ।। माता पिता गेली ती निजधामाला ।। प्रारब्ध ते संपताची आपुले ।।६५।। हा शके सतराशे अठ्याहत्तरचा काळ ।। उघडे पडले म्हणती रंगनाथ बाळ ।। परी व्यंकू आणि बाळाचा प्रतिबाळ ।। पितृव्य तो करी प्रीतीने ।।६६।। नरसींगरावाची ती पत्नी ।। प्रेमी असे ती सकळा लागुनी ।। व्यंकू आणि बाळासी त्या प्रेम लाऊनी ।। पालन करीत निज प्रिती ।।६७।। बापु आणि भगवान ।। तीचे हे पुत्र असती दोन ।। परी चौघाचा ही प्रतीपाळ तो समसमान ।। राधाबाई करी ती प्रीतीनें ।।६८।। सर्वा समागमें बाळ रंगनाथा ।। शिकऊ घातले त्यां शाळेत

आता ।। परी ते नयेचि त्याचिया चित्ता ।। खोडऱ्या तो करीत सर्वदा ।।६९।। स्वस्वरूप ज्ञान जयासी जहाले ।। त्या कैसे हे रूचावे सगळे ।। शाळेमाजी तो नानाचाळे ।। करूनीया राहेचि सर्वदा ।।७०।। धडा तो देता पाटीवरी ।। पाहुनी पुसे तो तेथेचि झडकरी ।। गणेंश सरस्वती ऐशा त्या मुर्ती करी ।। काढून पुजीत तेथेची ।।७१।। कोणी पंतोजीस जाऊनी सांगती ।। तोची रंगनाथा ते हाका मारिती ।। पाहु म्हणती धडा तो कैशा रीती ।। लीहीला आम्हाशी कळोदे ।।७२।। देवाची चित्रे ती पुजा पाहुनी ।। विस्मीत होतसे पंतोजी मनी ।। मग म्हणती रंग्या न येति विद्याती ऐसेनि ।। काही केल्याची सर्वथा ।।७३।। ऐसे ऐकताची जोडुनि कर ।। रंगनाथ बोले त्या पंतोजी समोर ।। म्हणे पोट बाबु असतील जे का नर ।। त्याही विद्या ही शीकावी ।।७४।। आम्हा नसेची त्याची गोडी ।। सद्गुरूचरणाची ती असे आवडी ।। ज्याचे नि ही ब्रम्हांडघडामोडी ।। कळुलागे सहजची ।।७५।। जग हे अवघे मिथ्या असोन ।। वायाच पाठी लागती हे सकळ जन ।। वांझेचा परीवार तो काय म्हणोन ।। पुसणें व्यर्थचि सर्वथा ।।७६।। ऐसी ऐकता वचनोक्ति ।। सकळाची होय कुंठीत मती । आपापल्या ठायी ते स्तब्ध राहती ।। शब्द न बोलती त्या मागुता ।।७७।। शाळा सुटताची सत्वरी ।। रंग्या भोवती ती मुले सारी ।। जमोनिया म्हणती ते आमुच्या घरी ।। दप्तर हे नेंऊनी ठेवीका ।।७८।। जो तो म्हणें रंग्या सत्वर ।। घरी नेऊनी ठेवी माझे हे दप्तर ।। आम्ही जातोरे खेळाया बाहेर ।। कळोने दि ते आणीकां ।।७९।। असो सकळाची ती दप्तरे शीरी ।। घेऊनी निघे हा रंग्या बाहेरी ।। ज्याचे जे दप्तर ते त्याचे घरी ।। नेऊनीया ठेवित आदरे

।।८०।। तो इकडे पंतोजी घरी येऊन ।। नरसींगरावाशी ते सांगती वर्तमान ।। म्हणती रंग्या तुमचा असोनी लहान ।। ज्ञान शिकवीतो आम्हाशी ।।८१।। काही समजुन सांगा तयासी ।। विद्या येईल त्याशी कैशी ।। हे न कळेचि ते कांही आम्हासी ।। म्हणुनीया तुम्हासी बोललो ।।८२।। नरसिंगरावाचे ते प्रेम फार । रंग्यावरी असे ते निरंतर ।। काहीच न देता ते प्रत्युत्तर ।। शांत नित्तेची बैसले ।।८३।। निरोप घेऊनीया झडकरी ।। पंतोजी गेले ते आपुल्या घरी ।। घरी जाता मग तो मार्गावरी ।। रंग्याशी येता देखिले ।।८४।। तो पाण्याची भरोन घागरी ।। देत होता आणिकाचे घरी ।। तो पंतोजीस देखुनीया हास्य करी ।। काय बोले तो होऊनी ।।८५।। काकाशी सांगता समाचार ।। काय मिळाले सांगा अुत्तर ।। यापरी खुणेचे बोल साचार ।। ऐकता विस्मय वाटला ।।८६।। रंग्या तो पळतची आला घरी ।। काकुशी म्हणे ओ दे भाकरी ।। काकु म्हणें रे ती खंड्या द्वारी ।। मरून आजी पडीयेला ।।८७।। खंड्या कुत्रा तो मेला सांगून ।। काकु सांगता ती करी रूदन ।। रंग्या म्हणे तू भाकरी दे आणून ।। खंड्या आम्ही ती खाऊ उभयतां ।।८८।। खंड्या मेला नाही तो झोपला ।। उगीच का म्हणसी मेला मेला ।। मग खिशातून भाकरीचा तो तुकडा फेकीला ।। यु यु म्हणताची आला धावत ।।८९।। ऐसे विपरीत ते देखताची नयनी ।। गहीवर दाटला तो काकु लागुनी ।। रंग्यालागी मग ते पोटी धरूनी ।। प्रेमाश्रु नयनी ढाळीत ।।९०।। मग रंग्यास भाकरी मिळताची झणी ।। येऊनी बैसला आपुल्या अंगणी ।। खंड्या सवे तो मग भाकरी खाऊनी ।। बाहेर गेला से निघोनी ।।९१।। तो खंड्याशी देखताची नयनी ।। नरसींगराव चकीत जहाले मनी

।। कांतेलागी मग ते पुसती येऊनी ।। प्रकार काय हा म्हणऊनी ।।९२।। खंड्या मेला त्याशी टाकावे नेंऊन ।। महाराशी सांगावया मी गेलो निघोन ।। तोचि आता मी येता परतोन ।। खंड्या हा धावतची आलासे ।।९३।। राधाबाईस न बोलनें किंचित ।। म्हणे करणी ही रंग्याचीं अघटीत ।। मग सांगता ऐकता हा वृत्तांत ।। प्रेमाश्रु लोटले उभयता ।।९४।। रंग्या न दिसताची क्षणभर ।। नरसींगरावाते वाटे हुरहुर ।। त्यातुन सरकारी काम ते फार ।। मागें असेची सर्वदा ।।९५।। नरसींगराव विचारी अंतरी ।। कोठे गेला असेल रंग्या बाहेरी ।। रंग्या रंग्या मग करीतची द्वारी ।। ठाकले येऊनी अवचित ।।९६।। तोची रंग्या तळ घरातुनी ।। आता येतो म्हणें मी पुजा सारूनी ।। पितृव्याशी ती सवड नसे म्हणुनी ।। पुजा ती नित्य करीतसे ।।९७।। पुजा करीता नित्य तळघरांत ।। आनंद वाटे याचीया मनांत ।। अधिकाधिक तो ऐसा एकांत ।। या परी भोगीत सर्वदा ।।९८।। काकु ती नित्य त्या रागाऊन ।। बळेचि क्रोध तो दावी बाहेरून ।। म्हणे रंग्या तू दे ह्या खोड्या सोडून ।। शाळेसी जाई रे आवडी ।।९९।। तुझे ते कल्याण व्हावे म्हणून ।। आम्हासी ती चिंता वाटे दारूण ।। नाई काकु नाई मी शाळेस जाईन ।। बोलोनी जाय तो तैसाची ।।१००।। एकदा शाळेस त्या जाती म्हणुन ।। बाहेंर पडला तो घरातून ।। अहोरात्र न कळे कोठे राहून ।। तळघरी येऊनी बैसला ।।१०१।। काका काकु ते त्याशी पहाती ।। ठिकाणे त्याची जे का सकळ धुन्डीती ।। रंग्या रंग्या म्हणुनी रस्तो रस्ती ।। धुंडीता न मीळेची रंगनाथ ।।१०२।। तोची प्रात:काळी दुसरीये दिनी ।। पश्चिम द्वारे जाता देखीला नयनी ।। मग तोंड धुताची धाव

घेऊनी ।। काकुनें दंडासी धरीयेला ।।१०३।। म्हणे कोठे होता रे कालपासून ।। धुंडीता आम्ही गेलो शिणोन ।। मग गालगुच्चा घेता तो श्रवण ध्वनी ।। खबरदार म्हणुनीया पडलासे ।।१०४।। रंग्या रडे तो आ वासोन । काकु पाहे ध्वनी हा आला कोठून ।। तोची अष्टभुजा देवी क्रोधायमान ।। मुखामाजी देखीली ।।१०५।। इकडे रंग्या म्हणे काकुनाई ।। आता मी कधी जाणार नाही ।। तोची नरसींगराव मग आले त्या ठाई ।। रूदन शब्दा त्यां ऐकुनी ।।१०६।। इकडे राधाबाई मुख न्याहाळीत ।। गाल गुच्चा तो असे एका हातांत ।। रंग्या तो काकु नाई नाई म्हणत ।। नरसींगराव ते ओढीती पत्नीशी ।।१०७।। क्रोधेची मग निज पत्नीशी बोलून ।। म्हणे तू रंग्याचा घेतीस का प्राण ।। बोलता बोलता तिशी ओढून ।। नेंले सत्वरी गृहांत ।।१०८।। ऐशी ही सुसंधी साधून ।। रंग्या गेला तो तात्काळ पळोन ।। इकडे राधाबाई सांगे पती लागून ।। प्रकार सर्वची घडला जो ।।१०९।। कथाभाग एवढाची घेऊन ।। प्रथमाऽध्याय केलासे पूर्ण ।। वदता वदविता तो रूख्मिणीं रमण ।। विश्वास मानसी असोद्या ।।११०।। पुढील अध्यायी सुरस कथा ।। केवळ अमृताची असे ती सरीता ।। वासुदेव प्रार्थी तुम्हा समस्ता ।। श्रवणी सादर करावे ।।१११।। इति श्री आत्मानंद चरित्र सार प्रथमो ऽ ध्याय: ।। श्रीकृष्णार्पण मस्तु ।। हरयेनम: ।। हरयेनम: ।।

श्री गणेशायनमः ।। श्री सरस्वत्यैनमः ।। श्री गोपाल कृष्णायनमः ।। जय जयाजी ब्रम्हानंदा ।। आदि अनादि सच्चीदानंदा ।। करूणालया तू आनंद कदा ।। पाव मुकुदा श्रीपतें ।।१।। सकळाशीं अससी तू अधिष्ठान ।। मग कोणाचे ते करावे कोणी वर्णन ।। तरी सत्यासत्य पहावे विवेके करून ।। तरीच सार्थक जन्माचे ।।२।। मायेच्या त्या आश्रये करून ।। नाना रूपे घेशी तूं जगज्जीवन ।। भक्ता सवे ते खेळ खेळून ।। संसारी दावीशी सर्वथा ।।३।। मायेचा आश्रय न घेता पाही ।। नाम रूप ते तुज काही नाही ।। मग खेळ खेळता नयेचि काही ।। सत्य हे असे की सर्वथा ।।४।। या मायेंच्याची आश्रये करनी ।। सगुणरूप जाहलासी तू चक्रमणी ।। दिन दयाळा कृपे येथुनी ।। पुढे चरित्र बोलवी ।।५।। मागील अध्यायात जहाले कथन ।। अष्टभुजा देवाचा तो प्रकार पूर्ण ।। भागीर्थीबाई सांगता पतीशी जाण ।। रंग्या तो पळून गेलासे ।।६।। आश्चर्य वाटले त्या उभयता ।। अघटीत म्हणती हे ईश्वरी सत्ता ।। कोणीतरी महापुरूष तत्वता ।। कुळीं अवतरलासे आमुच्या ।।७।। असो इकडे रंगनाथ पळाला जो येथून ।। तो शाळेतची गेला न लागता क्षण ।। उशीर तो जहाला त्याशी म्हणून ।। उभा केलासे सामोरा ।।८।। मग पंतोजी पुसती तयाला ।। काय रे उशीर हा तुजशी जहाला ।। गेला होतास कोठे कामाला ।। काल पासोन आम्हा ते कळोदे ।।९।। काही न बोलताची तो शांत ।। उभा राहीला तेथे रंगनाथ ।। पंतोजीस क्रोध येताची शिरमुखात चार दोन दिधल्या तेथेचि ।।१०।। पंतोजीस क्रोध आला पाहुनी ।। हलकेच म्हणे त्यां रंगनाथ दुरूनी ।। तुमचे हात दुखावले देऊ का चेपुनी ।। म्हणुनीया

जवळी गेलासे ।।११।। ऐशीया मधुर शब्दे करून ।। राग तो गेला केंव्हाची निघोन ।। रंगनाथा घेतले पुढे ओढुन ।। म्हणे दाब पाहु हात आता ।।१२।। रंगनाथ हाताशी दाबु लागला ।। तो तद्र भास जहाला पंतोजीला । की भस्मांकित एक जटाधारी आला ।। करीं सोटा तो घेऊनी ।।१३।। म्हणे बोल कीती मारील्या शीरमुखांत ।। शिक्षा ती तुज करू आम्ही त्वरीत ।। सोटा उगारीताची तो भयभीत ।। होऊनीया नेंत्र उघडीले ।।१४।। तो रंगनाथ हात दाबीसा देखीला ।। तात्काळ ओढुनी पोटाशीं धरींला ।। घडला प्रकार तो सवेची कथीयला ।। नरसींगरावा तें जाऊनी ।।१५।। तात्या पंतोजीस जवळ बैसऊन ।। प्रात:काळी घडला तो प्रकार सांगोन ।। मग राधाबाईस बोलाऊन ।। वृत्तांत सर्वचि कथीयेला ।।१६।। परस्पराची ती मात ऐकता ।। आश्चर्य वाटले ते तीघाचीये चित्तां ।। खंडच्या कुत्र्याचा तो वृत्तांत परीसतां प्रेमाश्रु ते लोटले तीघाशीं ।।१७।। या परी होताची बोल बाला ।। काका काकु ती न बोलती त्याला ।। मग शाळेशी तो रामराम ठोकीला ।। रंग्यानें त्यां एकपाची ।।१८।। रावा सुटावा तो पिंजऱ्यातून ।। तसे ते जहाले रंग्या लागून ।। नित्य रानीवनी स्मशानी हींडोन ।। स्वस्वरूपी राहे तो सर्वदा ।।१९।। रंगनाथ जाता मार्गावरूनी ।। कास सांगावे त्यां वाटेल त्यांनी आन मान न करता ची किंचित मनी ।। सांगीतल्या कामा तो करीतसे ।।२०।। कोणी ओझे ते उचलावया सांगतो ।। तो किती एश पाणी त्यां आण म्हणती ।। सांगितल्या कामा तो करी प्रीतीं ।। जड भरतचि एसा हा दुसरा ।।२१।। कोणी दिधल्या जरी त्याशी भाकरी ।। तशाची बांधी तो आपल्या पदरीं ।। गाय कुत्रे ती जी का मार्गावरी ।। पहाताची

घाली प्रीतीनें ।।२२।। राधाबाई म्हणें त्यां पतीला ।। द्विज संस्कार तो द्यावा रंग्याला ।। भगवानाच्या त्यां समांगमें त्याला ।। उजोनी या वाकावे एकदां ।।२३।। मग देशमुखी थाटाने मुहूर्त पाहुनी ।। दोघाच्या मौन्जी केल्या त्यां एके दिनीं ।। यज्ञो पवित तैसे ते गळा घालुनी ।। सोहळा संपूर्ण केलासे ।।२४।। कबई टोपी ती अंगी लेऊन ।। उभयतां करी ती देव दर्शन ।। राधाबाईस या परी ते समाधान ।। वाटले बटुशीं पाहता ।।२५।। तोची रात्रौ निजानिज जहाली ।। रंग्याची ती स्वारी हळुच उठली ।। तो थेट स्मशानीं जाऊनी बसली ।। जळ त्यां चिते जवळी त्या ।।२६।। भगवान त्याचे मागे मागे चालून । हळुच बैसला तो पाठी येऊन ।। तो जटाधारी एक तेथे नेत्र झाकुन ।। बैसला होता आधिच ।।२७।। चिता ती धडधडा पेटली ।। जाणवे कबई ती रंग्याने काढीली ।। टोपी तैशी ती लंगोटी टाकीली ।। चिते माजीं त्यां सर्वची ।।२८।। दत्त ऐसे बोलताची वचन ।। जटाधारी तो उघडी नयन ।। हितेकडे पहातां त्यां दत्त दर्शन ।। होऊनी समाधान पावला ।।२९।। रंगनाथ मोठ्याने ते हास्य करून ।। त्याशी म्हणें काही जहाले का दर्शन ।। जटाधारी पहाताची म्हणें आप कौन ।। म्हणूनीया आसन दिधले ।।३०।। रंगनाथ म्हणे मी देव बिव नाही ।। एका ब्राम्हणाचा मुलगा असे पाही ।। दर्शन व्हावे ते तुम्हा लवलाहीं ।। म्हणुनीया येथवरी आलोसे ।।३१।। बोलोनी ऐसा तो पळता सत्वरी ।। तो भगवान देखीला पाठीशी दुरी ।। म्हणें रे रंग्या तू सांग झडकरी ।। विपरीत काय हे केलेसे ।।३२।। ऐशी दिगंबर अवस्था पाहून ।। हासो लागला तो भगवान ।। म्हणे काकु आता तो तुज मारीन ।। कवण उपाय तो करावा ।।३३।। मग रंगनाथ

म्हणे भगवानाला ।। जानवे घालावे म्हण रे कानाला ।। त्रास होतो आम्हा तो लघुशंकेला ।। आठवण तीं मजसी राहीना ।।३४।। म्हणुनी दिधले मा ते फेकून ।। काकुस सांगरे तू समजाऊन ।। बोलता बोलता ते घरीं येऊन ।। पोहचले त्यां अपरात्रीं ।।३५।। मग समस्ता लागी ते उठऊन ।। भगवान सांगे ते वर्तमान ।। रोमांचिक ऐसा हा प्रकार एकून ।। मुग्ध जहाले ते सर्वची ।।३६।। तो तात्काळ दुसरे जाणवे काढून ।। रंग्याचे गळा ते घातीले आणून ।। कबई टोपी ती त्यां मागुता लेवऊन ।। काकु त्या समजावी प्रीतीनें ।।३७।। व्यंकु बापु पाहे तो भगवान ।। कसे वतती हे तिघेजण ।। जया सवे तूं सर्वदा राहून ।। शहाणपण काही घेईरे ।।३८।। ज्या रीती रंग्याशी काकु सांगत ।। त्या रीती तोशी तो हो हो म्हणत ।। परी तो दुसरीयेच दिनी स्मशानांत ।। आहोरात्र जाऊनी बैसला ।।३९।। अनेक वेळा काकु ती सांगता ।। परी तो नायके चि सर्वथा ।। रानीं वनी तो सदा हिंडता ।। नाहीच राहीला कधीहि ।।४०।। रात्रों कधी तो दीरांत ।। तो कधी राहे त्या मशीदींत ।। कधी तो जाऊनी स्मशानांत ।। रात्री रहातसे एकटा ।।४१।। भगवान तो ठेवी यावर दृष्टी ।। कधी सोडीना तो त्याची पाठी ।। रंग्याचा माग लागताची उठाउठी ।। जाय तो तेथेचि तात्काळ ।।४२।। गणेंश घाटावरी कधी जाऊन ।। दोन दोन दिवस राहें हा तेथेचि होऊन ।। नरसींग गीर बाबा हे महंत ।। असती तेवेचि सर्वदा ।।४३।। फुल झाडाशी येथे पाणी घालून ।। पडल्या कामा ते करीन सांगता आपण ।। बाबाशी ते प्रेम वाटे म्हणून ।। भोजन देत कधी कधी ।।४४।। रंग्याशी न मिळता कोठे अन्न ।। कोठुनिही आणि तो भाकरी मागून ।। गायी कुत्र्याशी यां

कधी चारून ।। आपणही तेथेच खातसे ।। ४५।। नरसुल्ला कादरीच्या जवळ ।। रंगनाथ तेथे हा असे सांज सकाळ ।। कधी नुरशहा वलीच्या दर्गी तळ ।। रात्रौ कोठे तो तेथेचि ।।४६।। एकदा गेला हा गणेंश घाटावरी ।। पर्जन्याच्या त्या येऊ लागल्या सरी ।। भगवान ही त्यासवे होता बरोबरी ।। उभयता बैसले तेथेचि ।।४७।। तोची रंगनाथ निघाला तेथूनी ।। चिंचे तळी मग बैसला जाऊनी ।। तो तेथेचि अंगते धरणी टाकुनी ।। शांत चित्तेची झोपला ।।४८।। शीत उष्णादि या दोन्हीची किंचित ।। रंगनाथ लागी ती नसेचि खंत ।। स्वस्थ झोपला परी भगवान जागृत ।। भुमिवरी तेथेची दडीयेला ।।४९।। भगवान सहज तो उघडीता डोळा ।। तो नाग दिसलासे विषारी पिंवळा ।। त्याही विळखा घालुनी फणा पसरीला ।। रंगनाथाच्या शिरी त्यां ।।५०।। महासर्प तो देखताची नयनीं ।। भगवान तो तात्काळ पळाला तेथुनी ।। नरसींगगीर बाबातें मग आला घेऊनी ।। दावी तो दुरूनी महंता ।।५१।। महा सर्प एसा हा पहाता डोळा ।। हुडहुडी भरलीं त्या दोघाला ।। म्हणती कवण उपाय तो करावा याला ।। रंग्या तो स्वस्थ निजलासे ।।५२।। निद्रित असताची मुखातुनी ।। दत्त ऐसा तो निघाला ध्वनी ।। ध्वनी निघताची मग विळखा काढूनी ।। काळ सर्प तो गेलासे निघोनी ।।५३।। आळ पिळे ते अंगासी देऊन ।। रंगनाथ बैसला तो तेथेची उठोन ।। भगवान आणि बाबा तेथे धाऊन ।। रंगनाथ जवळी आलेसे ।।५४।। नरसींगरावाशी कळतां मात ।। तेही तेथे आले धावत ।। रंगनाथ घेऊनी गेले त्वरीत ।। निजगृही त्या आपुल्या ।।५५।। जगतभाव जयाचा मावळला ।। महासर्प मग तो न करी काही त्याला ।। महा पुरूष कैसे ते कपटी

जनाला ।। शिक्षा ती करीती निजागे ।।५६।। ये विषयी जो का असे वृत्तांत ।। घडला तो परीसावा देऊनी चित्त ।। अधीकारी कैसा हा असे रंगनाथ ।। कळेल याचेनि तुम्हातें ।।५७।। जानुल्ला बाबुल्ला यवन साचार ।। उभयतां असती हे सहोदर ।। वली जे म्हणविती आपणासी थोर ।। वस्तीस असती येथेचि ।।५८।। काद्राबाद येथीची वस्ती थार ।। उभयताची असेहीं जहागीर ।। म्हणुनी म्हणविती हे जहागीरदार ।। दरारा सर्वत्र असेची ।।५९।। पोपट तो पाळीला उभयतानीं ।। बोले तो मंजुळवाणी ।। आल्या गेल्या सवे त्यां नित्य बोलोनी ।। प्रितीं रंजवी समस्तां ।।६०।। आश्चर्य वाटे सकळा लागुनीं ।। म्हणती पोपट हा असे सद्‌गुणी ।। जानुल्ला बाबुल्ला सवे ते या परी बोलुनी ।। धन्यवाद तो देती पोपटा ।।६१।। पोपटाचे ऐकता गुण वर्णन ।। उभयतांस वाटे ते मोठे भुषण ।। म्हणती एखादि ती मैना आणुन ।। ठेऊ आम्ही ती या सवे ।।६२।। तोची उभयतां लागी ती वार्ता कळली ।। की वस्तीस आहे जो निर्गुणशहा वली ।। त्याचिया मैने ऐशी ती मंजुळ बोली ।। देखीली नाही ती आजवरी ।।६३।। ऐसी वार्ता ति ऐकताची कर्णी ।। पाहु म्हणती मैना प्रत्यक्ष आणुनी ।। मग तात्काळ मैनेंसह त्या वली लागुनी ।। आणुनी घेतले आदरे ।।६४।। उभय बंधु ते तात्काळ उठोनी ।। उच्चासन देती ते शहा लागुनी ।। निर्गूणशहा तो येताची सदनीं ।। मैना सलाम बोले ती समस्तां ।।६५।। मग पोपटाकडे ती तात्काळ वळुनी ।। क्षेम कुशलादि पुसे त्यां लागुनी ।। इकडे बंधु ते शहाचे आतिथ्य करूनी ।। कृपा हुई म्हणती सहजची ।।६६।। निर्गुणशहा म्हणती मैनास ।। काही आयती म्हणून दावी तूं यास ।। तोची मैना कुराण कलेमादि समस्तांस ।।

म्हणोनीयी दावी सहजची ।।६७।। मग शहा म्हणती उभयतालागुनी ।। निरोप द्यावा तो आम्हां येथुनी ।। निघाला परस्परे सलामादि होऊनी ।। आले माघारा गृहीं त्या ।।६८।। मैना ती जाताची गृहातून ।। उदास बैसती ते दोघेजण ।। मग बादशहा सवारानें बोलाऊन ।। तात्काळ घेतले निजगृहीं ।।६९।। मग उभय बंधु आणि बागशहासवार ।। मिळोन एकांती करीती विचार ।। ऐसा ही करना विचार म्हणोनी परस्परा ।। हात मिळवणी करीताती ।।७०।। बाग शहासवार हा असे कोण ।। जरी का पुसती हे श्रोतेजन ।। तरी हा असे एक दुष्ट यवन ।। वली तो म्हणवित आपणां ।।७१।। नौगज नलीचे कबरे जवळीं ।। तेथेचि राहे हा कुटीलवली ।। फकीराचा पोर तो कदाकाळी ।। इनाम येतसे तो सेवेशी ।।७२।। असो जानुल्ला बाबुल्ला मींळोनी त्वरीत ।। निर्गुणशहासी ती दिधली दावत ।। मैनेंसाठी विष ते अन्नांत ।। निर्गुणशहाशी घातिले ।।७३।। प्रोणत्क्रमण जहालीयावरी ।। दफन केले त्यां जाऊनी दुरी ।। मग मैनेचा तो पिंजरा आणूनी ।। स्वानंदेचा ठेविला ।।७४।। मैना ती न बोलेची कोणा काहीं ।। पोपटही स्तब्ध तो आपुल्या ठायीं ।। मैना पोपट ते उभताही ।। दु:खीत मानसी जहाले।।७५।। जानुल्ला बाबुल्ला मैनेंजवळ ।। साक्षेपे पुसती तीजलागी खळ ।। मींया काहा है, बोलो मैना सकळ ।। परी न बोले ती किंचित ।।७६।। तिसरे दिनीं फात्या त्या द्यावया म्हणून ।। बोलाविले मग ते सकळा लागून ।। निर्गुंनशहाचा शिष्य वर्ग येऊन ।। स्तब्धचि तेथे बैसला ।।७७।। मग उभयतां बंधु म्हणती उठोन ।। रात्रौ एका एकी आले हे मरण ।। म्हणोनीया दफनाशीते पाचारण ।। नाही केले तुम्हाशीं ।।७८।। सकळा पुढे ते

ठेविले अन्न ।। फात्या त्या द्याव्या म्हणती आता उठोन ।। मग दिर्घ स्वरेंचि त्या पिंजऱ्यातून ।। मैना ती बोले समस्तां ।।७९।। खुन का खाना है ऐसे बोलोन ।। म्हणें निर्गूणशहाचा जहाला तो येथेची खून ।। जरी का तुम्ही सोडलींया मज येथून ।। लाश ती दावीन आताची ।।८०।। ऐकता मैनाचे ते ऐसे बोल ।। खळबळ उडाली ती एकची सकळ ।। मैनेचा पिंजरा तो घेऊनी तात्काळ ।। सोडुनी दिधले तीयेशी ।।८१।। मेरे पिछे आंव म्हणोनी उडाली ।। तो थेट चिंचेवरीच जाऊनी बैसली ।। तिच्या शब्दे ही सर्व मंडळी ।। चालुन अर्ध योजन गेलीसे ।।८२।। मैना बोले समस्तां लागुनी ।। मी जेथे उडी घेईन आता येथुनी ।। तेथेचि शहाची ती लाश पुरूनी ।। ठेविले असे त्या खळानीं ।।८३।। यावली यावली ऐसे म्हणोन ।। उडीं घेतली त्या चिंचेवरून ।। तो तात्काळ जहाली ती गतप्राण ।। अचेतन होऊनी पडीयली ।।८४।। मैना ती पडली यां ठीकाणी ।। उकरीता मग तेथेचि समस्तांनी ।। लाश मिळाली ती दृष्टि देखुनी ।। आश्चर्य वाटले ते समस्तां ।।८५।। मैनेची समाधी तेथेचि करून ।। सकळ गेले ते परतोन जन ।। इकडे बागशहा सवार त्यां पोपटाशीं घेऊन ।। केंव्हाच गेलासे स्वगृहीं ।। ८६।। खुन जहाला निर्गुणशहाचा म्हणोनी ।। कळोन न बोलती कोणासीं कोणी ।। दडपण जहागीरदाराचे असे ते मनीं ।। अधिकार सर्वत्र तयाचा ।।८७।। असो साक्षात्कारी आमुचा रंगनाथ ।। वृत्तांत कळताची निघाला धावत ।। बागशहा सवाराच्या घरी त्वरीत ।। येऊनीया बैसला बाहेरी ।।८८।। तो इमाम फकीराचा पोर तरूण ।। आधीच बैसला होता यऊन ।। रंग्याशी पहातां त्यां आनंद होऊन ।। जवळी येऊनी बैसला ।।८९।। म्हणें

धाकटच्या बंधूची अवस्था कठीण ।। असे म्हणोनीया मी आलोरे धाऊन ।। साईची ती विभुती आणावया म्हणोन ।। पाठविले घरानी मजलागी ।।९०।। साई ते आहेंत निद्रिस्थ ।। काय करावे या होतो चिंतेत ।। तो तू सामोरा दिसला रंगनाथ ।। म्हणोनीया समाधान वाटले ।।९१।। रंगनाथाच्या सहवासांत ।। इमाम विसरला ती घरती मात ।। बैसले उभयतां तेथेचि बोलत ।। तो तीन प्रहर रात्र जहालीसे ।।९२।। तो हळुचचि रंगनात म्हणे इमामाला ।। घेऊन ये आपणाकडे त्यां पोपटाला ।। इमाम तात्काळ उठुनी त्या पिंजऱ्याला ।। घेऊन आलासे बाहेरीं ।।९३।। उभयतां न करीताची काही विचार ।। पिंजऱ्यासह आले त्या मार्गावर ।। तैसाची क्रमुनिया मार्ग सत्वर ।। निर्गुणशहा जवळी आले ते ।।९४।। तो पोपट पख फडफडू लागला ।। रंगनाथ म्हणें त्या पोपटाला ।। भेटतोस काय जाऊनी मैनाला ।। म्हणुनींया त्या बाहेर काढीले ।।९५।। तो त्याचा जाऊ पाहे प्राण ।। मग कायसा पाला तो चुरगाळून ।। रस मुखी घातीला पोपट उडोन ।। चींचेवरी जाऊनी बैसला ।।९६।। तीच पाल्याची पुरचुंडी इमामा देऊन ।। जा म्हणें ही भावाशी दे नेऊन ।। जरी मेला असेल तरी हि रस काढून ।। मुखी त्याच्या घालीका ।।९७।। तोची पोपट इकडे ओरडून ।। सलाम घ्यावा म्हणें बाबा लागू न ।। रंगनाथ तेव्हां सैर करो मौज करो ऐसे म्हणोन ।। गेले निघोन तेथुन ।।९८।। निघता रंगनाथ सांगे त्याशी ।। बागशहा जरीका पुसेल तुजसीं ।। तरी थाप देऊनीया काही त्याशीं ।। इकडेच पाठुनी वेईका ।।९९।। इकडे पिंजरा नाही म्हणून ।। इमाम रंग्याशी तो पाहे जाऊन ।। इमामाचे घरी त्या येताची जाण ।। वृत्तांत तो कळला

सर्वची ।।१००।। माता म्हणें इमाम रात्री जो गेला ।। तो अद्यापही तुमचे कडून नाही आला ।। आता तरीं उदी द्यावी बाळाला ।। म्हणोनीया पुढे केलासे ।।१०१।। मग रक्षा ती घेवोनी हाती ।। मंत्र म्हणोणीया बाळा त्यां लाविती ।। इकडे पोपटाचा तो ध्यास असे चित्ती ।। न सूचे त्या कांही सर्वथा ।।१०२।। जे बागशहा तेथूनी निघाला ।। तै बाळाचा प्राण तो निघुनी गेला ।। तोची पुढे येता इमाम पाहीला ।। क्रोधे च मग त्यां बोलत ।।१०३।। बदमाष पिंजरा कहां है म्हणती त्याशी ।। तो म्हणें मलंगानें नेंले पोपटाशीं ।। एक शत ते रूपये तुम्हाशीं ।। देतो म्हणोनीया बोलीला ।।१०४।। निर्गुणशहा कडे गेला तो सांगून ।। तेसाची घरी तो आला निघोन ।। उदीस जाऊनी तू कफनाशी आला म्हणोन ।। बोल ऐसे त्या बोलती ।।१०५।। तोची यावली यावली म्हणोनी मंद रडला ।। पुरचुंडीचा रस त्यां मुखी घातिला ।। तोची बाळ तो मोठ्याने रडु लागला ।। आनंद तो जहाला सकळाशीं ।।१०६।। कफन काढीता ते लगबगी ।। मुलाची ते जहाली मुलगी ।। आश्चर्य वाटले ते सकळालागी ।। कैसे हे विपरीत म्हणोनीया ।।१०७।। इमाम तो तात्काळ निघोनी गेला ।। गेला तो पुन्हा नाही मागुता आला ।। पुढे रंगनाथा पासोन अनुग्रह घेतला ।। मौलानंद तो हाची जहालासे ।।१०८।। असो रंगनाथ हा सकाळीच एकदा घरी ।। येऊनीया मागे तो काकुशी भाकरी ।। काकुही चिडून म्हणे इतक्या लवकरीं ।। भाकरी कोठून रे आणाव्या ।।१०९।। जा म्हणें शेजाऱ्याकडून ।। विस्तु आणीका झडकरी जाऊन ।। मग मा देते भाकरी करून ।। येई सत्वर माघारा ।।११०।। शेजारीं जाऊन म्हणें ओ मावशीं ।। थोडा विस्तु तो द्यावा हो मजशी ।।

तो म्हणें काही आणावे न्यावयाशी ।। घेऊनी जाई का तेथुनी ।।१११।। ऐसे म्हणताच ती शेजारीण ।। टोपी घेतली शीरीचीं काढुन ।। विस्तु तो घेतला त्या माजीं भरोन ।। पळतचि गृही तो पातला ।।११२।। काकुनी दृष्टिशी ऐसे पाहतां ।। म्हणे रंग्या ती टोपीं जळाली आता ।। नाई काकु नाही काकु ऐसे म्हणता ।। चुलीत विस्तव घातीला ।।११३।। बाहेर आला टोपी झटकीत ।। म्हणें नाही जळाली काकु किंचिंत ।। राधाबाई ती आश्चर्य चकित ।। होऊनी या स्तब्धचि बैसली ।।११४।। पुढील अध्यायी सुरस वर्णन ।। श्रोती करावे ते प्रीती श्रवण ।। वदविता असे तो जगज्जीवन ।। वासुदेव त्यां निमित्त असेची ।।११५।। इ. श्री. आ. चरित्र सार द्वितीय ध्याय: ।। श्रीकृष्णार्पनमस्तु ।। हरयेनम: ।। हरयेनम: ।।२।। ।।२।। ।।२।। ।।२।। ।।२।।

श्री गणेंशायनम: ।। श्री सरस्वत्यैनम: ।। श्री गोपालकृष्णायनम: ।। जय जयाजी रूख्मिणी रमणा ।। भक्त वत्सला मन मोहना ।। त्रिभुवन वासीया अभिनंदना ।। नित्य निरंजना अवधुता ।।१।। ब्रह्मा विष्णु महेश मीळुनी ।। एकरूप जहालासी तु त्रिभुवनी ।। दत्तात्रय तुझे ते नाम म्हणुनी ।। पडले असेचि जगी या ।।२।। मायेच्या आश्रये सगुणमुर्ती ।। होऊनी लीला करीतोसी त्रीजगती ।। तुझा महिमा तो भक्तचि जाणती ।। त्या बिण आणिका कळेंना ।।३।। तुझा महिमा तो अघटीत ।। शेषादि कांही न कळे त्याचा अंत ।। दिन दयाळा तू जगन्नाथ ।। पुढे चरित्र बोलवी ।।४।। टोपी माजी विस्तव आणिला रंग्यानीं ।। काकुने पाहिला प्रत्यक्ष नयनी ।। विस्मय तो वाटला तिचीये मनीं ।। गत कथार्त इतुकाची जहाला ।।५।। एकदां गणेंश घाटी आखाड्यांत ।।

नागापंथी साधु आले फिरत ।। दोनशाहुनीहि अधिक हे संत महंत ।। येऊनीया त्यां शेरी उतरले ।।६।। हे रंग्याने रात्रीच पाहिले दृष्टिशीं ।। पळतचि आला तो पिस्तमजी पाशी ।। म्हणे चार आणी पाहीजे बंधी मजसी ।। ती आताची देईका काढुनी ।।७।। ते बहीर्दीशेस निघाले होते ।। रंग्याने मार्गीच गाठीले तयाते ।। बोलाऊनी मग एका दुकान दाराते ।। बंधी पावली त्या दिधली ।।८।। पावली येताची ती आपुल्या करीं ।। गांजा पुडी ती घेतली बाजारी ।। जाऊनीया मग त्या शेरी भितरी ।। गांजा पुडी देत समस्तां ।।९।। पावली गांजापुडी ती प्रत्येकास देऊन ।। तात्काळ आला तो बाहेर निघोन ।। किसका बच्चा कोन दिया, पुसती ओरडून ।। परी रंगनाथ गेला तो निघोनी ।।१०।। रामदेव प्रताप यांचे पेडीवरून ।। रंगनाथ तो जातसे मार्गी दुरून ।। हा ब्राम्हणाचा मुलगा वेडा म्हणून ।। बोलाऊनी म्हणती तयाते ।।११।। म्हणें रे येथे कुत्र पडले मरून ।। जरी का टाकीशी हे तीकडे नेऊन ।। घाण सुटली रे दोन दिवस पूर्ण ।। जहाले असती तयासी ।।१२।। रंगनाथ म्हणें मी फुकट करीना ।। शेटजी म्हणती हा घे आणा ।। कुत्रे चावलींया मग सांगा कोना ।। नका तो तुमचा आणा आम्हासी ।।१३।। भला वेडा बावळट तू दिससी ।। मेले कुत्रे का चावते तुजशीं ।। रंगनाथ म्हणे तो जिवंत आम्हासी ।। दिसते म्हणुनीया मी भीतसे ।।१४।। मग खिशातून काढीली भाकरी ।। कुत्र्याकडे पाहून यू यू करी ।। तोची कुत्रे ते पळतची झडकरी ।। येऊनी भाकरी घेतलीसे ।।१५।। शेटजी ते भयभीत होऊन ।। मार्गी आले त्या दुकानातून ।। रंगनाथाशीं मग त्या पोटी धरून ।। चरणी माथा ठेविला ।।१६।। हात धरूनी दुकाना भितरी ।। बैसविले

आणोनी त्या गादीवरी । पुढे न बोलाविताही रंगनाथ वरचेवरी । येऊ लागला सहजची ।।१७।। कधी तो म्हणे काका दारू दे आणून ।। कधी ती मीठाई मागे तो आपण होऊन ।। जो जो शब्द निघे त्याचे मुखातुन ।। तो तो शेटजी पाळीती ।।१८।। असो एके दिवशा प्रात:काळी उठोन ।। गणेश घाटावरी गेला तो निघोन ।। नकळे काय ते मनीं योजून ।। मुंडन करोनीया टाकीले ।।१९।। कोपीत जाणवे ते दिले फेकून ।। पर हंस बाणा हा स्वीकारून ।। घरी येताची नरसींगराव क्रोधे करून ।। काय बोलती रंगनाथा ।।२०।। कुलांगार तूं जन्मलाशी आमचे कुळीं ।। निघ घराबाहेर तू याच वेळी ।। आज्ञा ही होताची तात्काळी ।। घराबाहेर पडीयेला ।।२१।। घरूनी गेला तो एकदाची गेला ।। पुन्हा मागुता घरी तो नाहींच आला ।। इकडे पितृव्याशी तो पश्चात्ताप जहाला ।। धुंडाळी मग तो रंगनाथा ।।२२।। मशीदी मंदिरे सर्वचि पाहून ।। कब्रस्थान दर्गाहि ते स्मशान ।। व्यंकुसवे ते सर्वचि धुंडाळून ।। काढी एकदाचि सर्वस्वे ।।२३।। रावा निघावा पिंजऱ्यातुनी ।। तैसेचि जहाले ते रंग्यालागुनी ।। वाट फुटेल तिकडे जाय निघोनी ।। स्व:छंदेचि आपुल्या ।।२४।। अहोरात्र तैसाची चालून ।। नदिनाले ते ओलांडून ।। दऱ्या खोऱ्यातुनी तो मार्ग काढून ।। राजुरां पोहचला येऊनी ।।२५।। सिद्ध गणपतीचे असे हे स्थान ।। गजाननाचे जाऊनी घेतले दर्शन ।। एक यामीनी ती येथेची क्रमून दक्षीण दिश त्या चालीला ।।२६।। विदेही पणेचि वाट चालून ।। पैठणी आला तो षष्टी साधून ।। नाथ नामाचा तो गजर करून ।। आळवंठी येऊनी बैसला ।।२७।। अलोट समुदाय तो नयनीं देखीला ।। गुरू दत्त म्हणें हा अवघा

नटला ।। मार्गी जाता तो दृष्टि पाहिला ।। तंबु एक दुरोनी ।।२८।। दृष्टिक्षेप होताची तंबुवरी ।। समाधान वाटले ते अंतरी ।। मग उडी घेऊनीया गंगेभीतरीं ।। सचैल स्नान उरकीले ।।२९।। अमरखेडवासी सहजानंद यती ।। गोचरस्वामींही म्हणती ज्यां लोक प्रीती ।। ऐसा हा महाराज पैठणाप्रतीं ।। षष्टी निमित्त आलासे ।।३०।। तंबुमाजीं त्यांचे ते उच्चासन ।। रंगानाथांनी पाहिले वाळवंटी दुरून ।। मग त्या निथळत्या अंगानीच सामोरा येऊन ।। तंबु माजी ठाकला ।।३१।। दैदिप्यमान हा ऐसा बालक ।। पहाता थक्क जाहले ते सकळीक ।। सहजानंद यती त्या पाहुनी देख ।। प्रश्न ते पुसती प्रीतीनें ।।३२।। म्हणतीरे बाळा आलासी कोठून ।। कोण आहेस ते सांग आम्हालागून ।। बाळ म्हणें तेची पुसावया लागून ।। चरणी तुमच्या पातली ।।३३।। ऐसे ऐकताची उत्तर ।। स्वामीस दाटला तो गहींवर ।। धन्य धन्य म्हणतीं हा ज्ञानसागर ।। शिष्य आम्हासी लाधला ।।३४।। प्रेमालिंगन ते दिधल्यावरी ।। बाळ बोलु लागला ते अवसरीं ।। नामदेवा तो चरणस्पर्श जहालीयावरीं ।। शिवमय सर्वचि जहाले ।।३५।। तैसेचि मज या अंग स्पर्शे करून ।। दत्तमय जहाले हे त्रयलोक्यपूर्ण ।। आता मी तू पणाशी ठाव म्हणून ।। उरला नसेचि किंचित ।।३६।। यापरी बोलूनिया तत्वतां ।। चरणीं तो तात्काळ ठेविला माथां ।। कृपाहस्त शीरीं तो सद्गुरू ठेविता ।। नाम गजरती जहालासे ।।३७।। आत्मानंद सरस्वती ऐसे म्हणोन ।। सद्गुरूने त्यां नाभिधान ।। सहजानंद महाराज की जय म्हणोन । रंगनाथ हा निघाला तेथुनी ।।३८।। आता त्यावर अनुग्रह जहाला ।। रंग्या न म्हणु आम्ही येथुनी त्यालां ।। रंगनाथही म्हणती ती आम्हाला

।। लाज वाटेची सर्वथा ।।३९।। प्रसंग त्या महाराज म्हणुनी ।। संबोधु या पुढे त्या आवर्जूनी ।। अवधुतमुर्ति हो यापरी तेथुनी ।। ग्रामाबाहेर आलीसे ।।४०।। गंगा प्रदक्षीणा ती व्हावी म्हणून ।। पश्चिमेस तेंव्हा केले प्रयाण ।। आपेगांव रामसगांव शेवता करून ।। उत्तर दिशा ती घेतली ।।४१।। भादली टाकरवनही गांवे पाहून ।। शेवटी घेतले ते धारकल्याण ।। कडवंचीच्या त्या शिवारातुन ।। उत्तर दिशेसी चालीले ।।४२।। गावच्या उत्तरेस ती टेकडी एक ।। सुळकी नामे ती सपाटी देख ।। सृष्टि सौदर्य तेथीचे अलौकीक ।। सुरम्य असेकी सर्वदा ।।४३।। या सुळकीवरी असती पाण्याचे झरे ।। तैसेचि श्वापदाचे त्या दरे खारे ।। कितीएक असती पुरातन भुयारे ।। भयानक वाटती जे सर्वदा ।।४४।। भागुजी कुंभार निवडंगावासी ।। देवी उपासक होता तो याच प्रदेशी ।। देवीदास महाराज म्हणती त्याशी ।। ह्याची एका कारणें ।।४५।। पुढे झुब्बा टोपी यासी देऊन ।। सांप्रदायामाजी घेतले मिळून ।। सुळकीवरी ते स्मारक म्हणून ।। समाधी एकती केलीसे ।।४६।। वायाळ सावरगांव वस्ती लहान ।। हेची असे ते खरे समाधीस्थान ।। प्रतीवर्षी यात्रेसी अपार जन ।। दर्शनाते येती आवडी ।।४७।। असो सुरम्य ऐशा त्यां एकांत स्थानी ।। महाराज रहाती ते स्वच्छंदे करूनी ।। कंद मूलादि ते नित्य सेऊनी ।। स्वच्छंदेची वर्तती सर्वदा ।।४८।। यापरी बराची लोटती तो काळ ।। वरूड ग्रामीचे ते मस्की पाटील ।। महादु ज्या म्हणती नामे सकळ ।। वनीं त्या सहज आलेची ।।४९।। वनश्री ती पहाता विलोकून ।। तो आवचित पाहीले महाराजा दुरून ।। तेज:पुंज ऐसा हा पुरूष देखून ।। समाधान वाटले अंतरी ।।५०।। ब्रह्मानंद

महाराज पिंपरीकर ।। हा त्याचाची शिष्य असे पाटील थोर ।। भीत भाताची तो येता समोर ।। महाराज त्यालागीं बोलती ।।५१।। या म्हणती तुम्ही महादु पाटींल ।। हे चांगले आहे बुवा म्हणती जंगल ।। ब्रह्मानंद सुख सोहळा हा पाहूनी सकळ ।। भोगीतो आम्ही येथेची ।।५२।। ऐशी ऐकता महाराज वाणी ।। आश्चर्य वाटले पाटलाचीये मनीं ।। म्हणें माझे नांव या पुरूषासी कोणी ।। न कळे कैसे कथीयेले ।।५३।। मग सामोरा समीप येऊनी ।। दंडवत घातीले महाराजा लागुनी ।। जरी आज्ञा असेल तरी घरी जाऊनी ।। भाजी भाकरी मी आणितो ।।५४।। महाराज म्हणती तुमचे मळ्यातून ।। आणा भाजी भाकरी ते कालवण ।। आज वांग्याची भाजी ती केली जाईल ।। तेची आणावे आम्हासी ।।५५।। आश्चर्य वाटले ते पाटलाचीये मनां ।। वांग्याची भाजी ती कैसी कळली यांना ।। साक्षात्कारी असती हे नुमजेची आपणां ।। दर्शन भाग्येची जहाले ।।५६।। मळ्यामाजी सत्वर जाऊन ।। भाजी भाकरी ती आणली तेथुन ।। महाराजालागी ते तात्काळ देऊन ।। उभा ठाकला सामोरी ।।५७।। पाटलाचा आग्रह आणि ती भक्ति ।। पाहुनी महाराज ते येती जाती ।। किसन भाऊ नाकेदार नित्याप्रती ।। सेवा ती इच्छिती सर्वदा ।।५८।। मळ्यामाजी मळताची सगळे ।। महाराज म्हणती ब्रह्मानंद हे अधिकारी वेगळे ।। नाही काही पाटील यमाला मागे फिरविले ।। दोन वेळा ते सहजची ।।५९।। ऐसे ऐकता खुणेंचे बोल ।। समस्ता वाटे ते अधिकची नवल ।। मग महाराजालागी ते म्हणती सकळ ।। मठ तो येथेची बांधावा ।।६०।। महाराज म्हणती किसन भाऊ आता हे राहुद्या पुढे पाहु ।। आधि केशवराजाचे ते दर्शन घेऊ ।।

कुळ दैवत असे हे आमुचे ।।६१।। जन्म भुमीचा तो आठव अंतरी ।। होताचि आले ते जालनापुरी ।। तैसेचि येता मग आपुले घरी ।। अवचित व्यंकुने त्यां पहीले ।।६२।। हंबरर्डा फोडुनी पडला गळां ।। म्हणे रे आजवरी होतासी कोठे बाळा ।। रंग्या रंग्या करीतचि प्राण सोडीला ।। काका काकुनी शेवटी ।।६३।। व्यंकुचे ते समाधान करूनी ।। महाराज ते बैसले तळघरी जाऊनीं ।। सकळ दैवताचे ते दर्शन घेऊनी ।। बाहेर आले ते तात्काळ ।।६४।। इकडे व्यंकु तो सांगे पत्नी लागून ।। आण ताटे ती आता वाढून ।। मग अनुजासवें जवळ बैसून ।। भोजन सारीले प्रीतीनें ।।६५।। पुढे महाराज जालनापुरीच रहाती ।। पूर्वस्थळे ती विलोकिती ।। किर्ती ऐकुनीया लोक येती जाती ।। जालनापुरी ते सर्वदा ।।६६।। अनेकाची भक्ती असे ती महाराजावरती ।। त्या माजी किती एक सान थोर असती ।। ज्यां माजीं रंगारीण लक्ष्मीबाई प्रीतीं ।। नित्य जेऊ घालीत महाराजां ।।६७।। महाराजां भोजन घातील्याविण ।। ती न सेविच कधी अन्न ।। कब्रस्थान मशीदी स्मशानादि धुंडून ।। महाराजां भोजण देतसे ।।६८।। एकदा पर्जन्यवृष्टि ती जहाली फार ।। सरीतेस आला तो महापूर ।। दोन्ही तीरावरी जन समुदाय साचार ।। जमला त्यां अंत नसेचि ।।६९।। नित्यापरीं काद्राबादेतून ।। बाई निघाली ते भोजन घेऊन ।। हाती ताट आणि लुगडे ते वरी खोऊन ।। चिंतन करीत चालीलीं ।। ७०।। चोहीकडे जन समुदाय दाटला ।। सरीतेस तो महापुर आला ।। परी बाईचे मनी तो गुरूध्यास लागला ।। कोठे भेटतील म्हणोनीया ।।७१।। तैशाची तद्री माजी नदी उतरून ।। लक्ष्मीबाई पोहचली मठीं येऊन ।। तो केशवराजाचे मंदिरी

महाराज देखून ।। ताट सामोरा ठेविले ।।७२।। महाराज म्हणती महापुर आहे नदीशी ।। बाई येथे तूं आलीस कैशी ।। ती म्हणें नाही महाराज गुढध्याचे वरती कोठच मजसी ।। पाणी नसेचि लागले ।।७३।। महाराज म्हणती धन्य आहे तुझी श्रद्धा भक्ति ।। मागुता भोजन घेतले प्रीती ।। वेळी अवेळी महाराज सदनाप्रती ।। नित्य जाती येती बाईच्या ।।७४।। म्हणें बाई रोज येतो आम्ही तुझे घरी ।। लोक तुज म्हणतील कांहींतरी ।। ती म्हणें जाऊद्या महाराज ती गोष्ट न आणावी अंतरी ।। मी तो पायाविण या अन्य नेणेची ।।७५।। पुढे महाराजाचा तीजवर प्रसाद जहाला ।। आणि शेवटही तीचा गोड केला ।। संत सामर्थ्य न कळे ते आणिकाला ।। एक त्यां श्रीहरी वाचुनी ।।७६।। ब्रह्मानंद यती पिंपरीकर ।। राजयोगी ऐश्वर्य ते जयाचे थोर ।। दोन वेळा काळाशी या हुळकावणी साचार ।। देऊनी समाधी योग दाविला ।।७७।। ते जालनापुरी सहज येतां ।। महाराजाही कळली असे वार्ता ।। पिसा बावळा वेष मुळी तत्दतां ।। सामोरा दत्त म्हणोनी ठाकिले ।।७८।। योगीयाचे ऐश्वर्य थोर ।। महाराज ते दिसती केवळ फकीर ।। देखता ब्रह्मानंद उठोनी सत्वर ।। हाती धरींलेसे आदरे ।।७९।। उच्च असनावरी त्यां बसा म्हणतो ।। महाराज नाई नाई त्या म्हणतीं ।। अहो घाणेंरडे आहोत आम्ही किती ।। तुम्हां जवळी कैसे बसावे ।।८०।। ना आंघुळ कधी ना वस्त्रे निर्मळ ।। नाकी शेंबुड मुखी असे ती लाळ ।। ब्रह्मानंद म्हणती ते असुद्या सकळ ।। आजी कृतार्थ केले हो आम्हासी ।।८१।। इच्छा जी का होती आजवर मनी ।। ती आज घडविली हो आपण होऊनी ।। परमहंस दत्तरूप आजी देखीले नयनी ।। प्रत्यक्ष तुमच्या या दर्शनें ।।८२।। मग

पुजा वस्त्र प्रावर्णे आपुल्या ।। प्रीतीनें घातीले सुग्रास भोजन ।। आत्मानंद महाराजकी जय म्हणून ।। सन्मान सोहळा संपविला ।।८३।। तीसऱ्याहीं वेळी काळ तो टाळावा म्हणूनी ।। ब्रह्मानंद चालीले समाधीस्थानीं ।। महाराजांचे ते नाम घेऊनी ।। गुंफेमाजी उतरले ।।८४।। तोची दत्त ध्वनी ऐकीला सामोरी ।। महाराज म्हणती कीती वेळाही करावी चोरी ।। खुणेंचे हे बोल पटता अंतरीं देह विसर्जन केलासे ।।८५।। असो एकदां भगवंतराव वकीलाचे घरी महाराज असतां ।। पैठणचा पाटील आला तेथे अवचिता ।। म्हणें आम्ही या महाराजां नित्यस्नान करीता ।। गंगेवरी पहातो प्रतीदिनीं ।।८६।। पुढे एकदा रामराव पोलीस जमादार ।। बाजारीं जाता एक कुक्कुट देखीला सुन्दर ।। देखताची म्हणें घेऊ सत्वर ।। आमंत्रण देऊ ते महाराजा ।।७।। आज सांगोती उत्तम रांधून ।। महाराजा घालू म्हणतसे भोजन ।। सुरा तैशी ती उत्तम पाजून ।। तोषऊ म्हणतसे महाराजां ।।८८।। गृहीं कांतेशी बोले जमादार ।। कुक्कुट असे हा अति सुन्दर ।। सांगोती रांधीओ आताचि सत्वर ।। घेऊन येतो मी महाराजां ।।८९।। पती आज्ञा होताची ऐशारीती ।। मागुबाई कंष्टी होतसे आपुल्या चित्तीं ।। म्हणें कैसे हे महाराज आणि कैसा हा पती ।। अघोर कृत्य हे त्यां कळेना ।।९०।। महाराज ते पूर्ण अंतरज्ञानी ।। कळले सर्वची ते न सांगता कोणी ।। पश्चिम द्वारे ते आपण होऊनी ।। हाका मारीती त्यां भागुशीं ।।९१।। परसदारीच कोंबडे शिजु घातिले ।। महाराज येऊनी तेथेचि बैसले ।। भागुबाईस म्हणती कोंबडे मेले ।। झाकण काढीवी सत्वरी ।।९२।। बाईस मानसी हासु आले ।। झाकण ते तात्काळ येऊनी काढीले ।। तीची कोंबडे

उडून गेले ।। पंख फडफडोनी बाहेरी ।।९३।। महाराज म्हणतीं कीतीग आहेस तु निर्दय । जीवंत कोंबडा मारू पहातेस काय ।। झाकणाखाली तो गुदमरोनी जाय ।। परी तूं झाकण काढीना ।।९४।। तू अंगेचि करूनी वाईट कृती ।। दोषी म्हणतीस गे आपुला पती ।। महाराजांची ही म्हणती कैसी रीती ।। व्यर्थ कृतर्क ते काढूनी ।।९५।। या परी ऐकता खुणेंचे बोल ।। भागुबाई झाली मनी खजील ।। म्हणे अपराधी मी दुष्टखळ ।। म्हणुनींया चरणी लागली ।।९६।। आश्रु वहाती नेत्रातून ।। महाराज उठविती करे धरून ।। म्हणती पतीआज्ञा ती तुज प्रमाण ।। दोष देऊ नये त्यां कधीही ।।९७।। जमादाराशीं मग बोलाऊन ।। प्रसाद तीर्थ देऊनी केले समाधान ।। पती पत्नीलागी तो सन्मार्ग दाऊन ।। निघुनिया मग गेले तेथुनी ।।९८।। कधी महंत बन्सीदास बैराग्याचे आईकडून ।। भाकरीं घेऊनी खाती तेथेची बैसून ।। गटाराचे मग त्यां पाणी पीऊन ।। स्वच्छंदे जाती तेथुनी ।।९९।। असो नित्य एका दारूच्या दुकानी ।। कलालापाशीं जाती आवर्जूनी ।। दारू दे म्हणतीं प्याला भरूनी ।। तो ही नित्य देतसे ।।१००।। एके दिनी सहज बोलीला ।। नित्य कैसा हा मागतो एक प्याला ।। आज दारूच देऊ नये म्हणें त्याला ।। तो अवचितची महाराज पातले ।।१०१।। दारू दे म्हणताची तो म्हणें आज नाही ।। महाराजही म्हणती काही हरकत नाही ।। मग तोंडचि पिण्यास लाविता पाही ।। संपविला पींप तो सर्वची ।।१०२।। चकीत जहाला तो कलाल मनीं ।। येऊनी लागला महाराज चरणीं ।। परी महाराज पुन्हा कधी त्या दुकानी ।। चुकुनीया गेले नसेचि ।।१०३।। असो महाराज बिदोबिदी जात असतां ।। काही यवन ते येऊनी धरीती हातां ।।

म्हणती चलावे महाराज भोजना आतां ।। तयार असे ते आमुचे ।।१०४।। तुम तो औलीया आहे म्हणती ।। तुम्हास नाही ती जाती पाती ।। महाराजहि बीसमील्ला म्हणोनी अति प्रीतीं ।। येऊनी तेथे बैसले ।।१०५।। तो गोमांसाचा खाना पाहून ।। महाराज तो तेथेची झुब्बा वरी करून ।। लघवीनेच आपुले मुत्रे हात धुऊन ।। तय्यार जहाले ते भोजना ।।१०६।। सर्व यवन ते चवताळून ।। म्हणती शैतान है ये देती महाराजा काढून ।। महाराजही जातीं तात्काळ निघोन ।। स्वच्छंदेची आपुल्या ।।१०७।। असो संत लिलेचे हे उद्यान ।। सुगंधीत पुष्पांनी गेलेसे फुलुन ।। वासुदेव प्रार्थी श्रोतया लागून ।। मकरंद तो सेवावा येऊनी ।।१०८।। इति श्री. आत्मानंद चरित्रसार तृतीयोध्याय: ।। ।।श्रीकृष्णर्पणमस्तु ।। हरयेनम: ।। हरयेनम: ।। ।।३।। ।।३।। ।।३।। ।।३।। ।।३।। ।।३।।

श्री गणेंशायनमः ।। श्री सरस्वत्यैनमः ।। श्री गोपालकृष्णायनमः ।। जय जयाजी पंढरीनाथा ।। आदि अनादि विश्वनाथा ।। सकळ जगताचा तू कर्ता हर्ता ।। विश्वंभरा तू विंश्वपते ।।१।। तुझीया सत्ते वाचुनी ।। विश्वरूप नयेचि विश्वा लागुनी ।। दिनदयाळा तूं कृपे येथुनी ।। पुढे चरित्र बोलवी ।।२।। गताध्यायी ते जहाले कथन ।। यवन देतो महाराजा काढुन ।। यवनाचे ते कपट ओळखून ।। फट फजीती यापरी केलीसे ।।३।। असो, आतां परीसावे ते सावधान ।। महापुरूष एक आनंदीस्वामी म्हणून ।। जालनापुरी याच विद्यमान । होते विख्यात सर्वही ।।४।। एकदां शिंदे सरकार याच मार्गानी ।। स्वारीस निघाले सैन्य घेऊनी ।। स्वामीची किर्ती ती पडता कानी ।। दर्शना निमित्त पातले ।।५।। सामोरी येंताची दर्शना ।। पाठ फिरऊनी स्वामी बोलतीना कवणा ।। तीन वेळ यापरीं होता जाणा ।। चपराक एक मारीली ।।६।। शिंदे सरकार संतुष्ट होऊन ।। प्रसाद हाची जहाला म्हणती पूर्ण ।। पुढे अपार यश ते सपादून ।। दर्शना पातले स्वामीच्या ।।७।। एक गांव देता जहागीर ।। स्वामी म्हणती नकोही उपाधी शिरावर ।। नाथांशी द्या म्हणुनी प्रत्युत्तर ।। स्वामीने दिधले शिंद्याशी ।।८।। मानुनी स्वामीचे ते वचन प्रमाण ।। जाहागीर दिघली ती नाथाशी नेंऊन ।। मंदीर एक ते स्वामीशी बांधुन ।। तळघरासहीत दिधले ।।९।। याच तळघरी स्वामी नित्य बैसती ।। पुढे माघ आष्टमीं आला तीथी ।। बाबा ढोले यास स्वामी म्हणतीं ।। तळघरी न यावे कोणी येथुनी ।।१०।। द्वार ते करावे बंद येथुन ।। आता येईल त्याचे वंश खंडण ।। होईल निश्चयें हे वचन प्रमाण ।। मानुनी वर्तावे सर्वदा ।।११।। पुढे अंबड तालुक्यातील एक गृहस्थ ।। शंकर

कुळकर्णी ज्यां म्हणतीं समस्त ।। दर्शनानिमित्तची तो मंदिरात ।। जाऊन म्हणतसे त्यां तळघरी ।।१२।। बाबा ढोले सांगती समजाऊन ।। परीं तो नायके कोणाचेहि वचन ।। आंत उतरतां तो श्रवणी पडला ध्वनी ।। हो मागे तूं येऊ नको पुढती ।।१३।। बाहेर हो होईल तुज दर्शन ।। बाहेर येताची पुढे दत्त म्हणून ।। महाराज सामोरा ठाकती ।।१४।। हास्य करून महाराज म्हणती ।। काहो दर्शन जहाले कां तुम्हाप्रती ।। खुणेंचे बोल ऐकतां चित्ती ।। चरणी माथा ठेविला ।।१५।। महाराज म्हणती जा येथुनी ।। शंकरबुवा निघे तो तात्काळ तेथुनी ।। तंद्रीमधेची ती अमरावतीस येवुनी ।। स्वानंदेची पोहचला ।।१६।। तेथे वेशीतची जो बैसला ।। पुन्हा मागुता तेथुन नाहीच उठला ।। अन्न पाणीं ते लोक त्याला ।। ठायीच आणुनी पुरविती ।।१७।। पुढे महाराज उमरावतीस जाती ।। मार्तन्ड बापु ते सांगती असती ।। एका आमराईमध्ये जाऊनी उतरती ।। निज छंदेचि आपुल्या ।।१८।। महाराज म्हणती बापु एक चेला ।। आमुचा आहे उमरावतीला ।। घेऊनी यावे ते तुम्ही त्याला ।। संकेत येवढाच दिधला ।।१९।। अस्पष्ट ऐसा संकेत ऐकुनी ।। चकीत जहाले मार्तन्ड बापु दोन्ही ।। म्हणती नाव ठिकाणा काय म्हणुनी ।। कैसे पुसावे महाराजाला ।।२०।। मग ते तेसेची नीघाले ग्रामाभितरीं ।। अवचितची येता त्यां वेशीवरी ।। तो शंकरबुवा ओरडून उभयता विचारी ।। काहो महाराज आलेत का सांगाती ।।२१।। हो म्हणताची शंकरबुवा उठले ।। उभयतां समागमे ते चालिले ।। आमराई माजी महाराजा देखिले ।। तोची पाठ फिरऊन बैसती महाराज ।।२२।। दोन काड्या घेऊनी हाती ।। भज गोविंद आनंदीस्वामी म्हणती ।। तालावरी

ऐसा तो संकेत करीती ।। जा म्हणाव बापु तयाला ।।२३।। गुरूचं नांव ठेव म्हणावं चित्तीं ।। त्याची सत्ता आहे त्रिजगती ।। त्याविण नसे रे कोणा सद्‌गती ।। बापु जाजा म्हणोनी त्यां सांगावे ।।२४।। मौनेची करूनी महाराजा नमन ।। शंकरबुवा निघाले तात्काळ तेथून ।। मग पूर्वस्थळाते स्वानंदेचि येऊन ।। स्वस्थ चित्तेंचि बैसले ।।२५।। महाराजही मठी येता परतोन ।। दृष्टी देखीले एकदां दुरून ।। तो माळ्याचा पोर एक घंटी वाजऊन ।। दारोदार भिक्षा मागतसे ।।२६।। सतेज ऐसा हा देखताची पोर ।। महाराज त्यां पाचारीती समोर ।। समीप येता नांव तुझे साचार ।। सांग म्हणती आम्हाशीं ।।२७।। तो म्हणे मी माळ्याचा माझे ते नामाभिधान ।। नाग्या नाग्या म्हणती सकळ जन ।। पिताहीन माता ती एकटी जाण ।। गृही असे हो मजलागी ।।२८।। खंडोबाचे नांवे भिक्षा मागून ।। पोटापुरते मिळवितो अन्न ।। म्हणोनी वाघ्या ऐसे म्हणती काही जन ।। नित्य येथेचि राहतो ।।२९।। तेजस्वी ऐसा हा पोर माळी ।। हळद लाविलिसे समस्त भाळी ।। घंटा ती शोभे करकमळीं ।। महाराज बोलती त्यां प्रीतीनें ।।३०।। वाघोबा येतास का आमच्या बरोबर ।। हो म्हणोनी निघाला सत्वर ।। मस्तक ठेविले चरणावर ।। मठीं येऊनी बैसला ।।३१।। मातेचा धाक तो होता मनीं ।। म्हणुनी मठां येतसे नित्य चोरूनी ।। माता येताची नाग्या म्हणुनी ।। जा जा म्हणती महाराज त्या ।।३२।। पुढे माता निजधामा गेलींयावरी ।। दिक्षा ती दिधली नाग्याशीं सत्वरी ।। झुब्बा टोपी देऊनी कृपाहस्त शिरीं ।। महाराज ठेविती तात्काळ ।।३३।। सदानंद महाराज नाम ठेऊन ।। जयजयकार करीती सकळ जन ।। पुढे महाराज त्यां देवा ची म्हणून ।।

हाका मारिती प्रेमेची ।।३४।। असो राजा नरसींगगीरजीचा भावी दत्तक ।। बालमुकुंद नामे असे एक ।। काही तो मत्सर उद्‌भवताची देख ।। पिंपरीस येऊनी राहिला ।।३५।। तेथे महाराजाची होता दृष्टादृष्ट ।। मोह तो त्याचा झालासे नष्ट ।। मग महाराजाशी तो एकनिष्ट ।। होऊनी समागमेची राहीला ।।३६।। प्रसाद झुब्बा टोपी त्याशी देऊन ।। सांप्रदायीं त्यां घेतले मेळऊन ।। स्वामीं बालमुकुंद महाराज म्हणून जयजयकार सर्वत्र केलासे ।।३७।। टेंभुर्णी नाव्हा येथे काही काळ क्रमुन ।। शेवटी धोत्रे मुक्कामी शिश्यामाजी राहीले जाऊन ।। पुढे स्वामी तेथेचि समाधिस्त होऊन ।। शेवट गोड जहालासे ।।३८।। असो एकदां जळगांव पहाडीतून ।। महाराज हींडती राणोरान ।। डाकु लोकाचे हे प्रसिद्ध स्थान कोणी न जाती मार्गी त्या ।।३९।। डाकुने महाराजां पाहीले ।। पाठलाग करताची त्या दरडाविले ।। महाराजांनी वळून तोंड फिरविले ।। तो दृष्टादृष्ट जहाली ।।४०।। हत्यारबंद शरीर यष्टी पुष्ट थोर ।। चालून आलेसे महाराजावर ।। महाराजही म्हणती आँव आँव शंकर पोतदार ।। जरा चिलम तो लेलो अभी ये ।।४१।। कुळासकट नाम श्रवणीं पडता ।। ओशाळून गेला तो डाकू आता ।। थोर संताचा हा दृष्टिक्षेप होता ।। विरमला तो तात्काळ तेथेचि ।।४२।। मग शस्त्रे ती दिधली तात्काळ फेकून ।। दृढ धरिले ते महाराजाचे चरण ।। महाराजही त्याशी ते हाती धरून ।। जळगांवी आले ते तात्काळ ।।४३।। सकळाशी मग ते बोलाऊन ।। महाराज सांगतो समजाऊन ।। यासी द्यावे एकादे गृह पाहून ।। गांव भाऊ असे हा तुमचा ।।४४।। संत दर्शनें जहाले निर्मळ मन ।। पुढे तो करू लागला ईश्वर भजन ।। संत

कृपेची मग तो सुखी पुर्ण ।। होऊनीया ।। तेथेचि राहीला ।।४५।। असो कितीही व्यभिचारी दुष्ट असला जरी ।। संतकृपा ती होताचि त्यावरी ।। तयाचा उद्धार तो होय निर्धारी ।। ये विषयीं वृत्तांत परीयेसा ।।४६।। फुलंब्री ग्राम नामे करून ।। औरंगाबाद समीप असे हे लहान ।। माळी कुळामाजी एक कन्या होऊन ।। सरी ऐसें नामाभिधान ठेविले ।।४७।। पूर्वकर्म तिचे बलवत्तर ।। म्हणुनी नवऱ्याने काढीले घरा बाहेर ।। मग  चंद्राबाईच्या त्या आश्रयावर ।। औरंगाबाद येथेचि राहीली ।।४८।। तेथे मोलकरीण म्हणोन कामकरी ।। परी वेश्यागृह असे ते व्यभिचारी ।। किळस वाटे तिज ते देखुनी अंतरी ।। परी उपाय तो आन नसेचि ।।४९।। तो सहज एके दिनी दत्त म्हणून ।। महाराज ठाकती सामोरा येऊन ।। चंद्राबाई वेश्येस आदर पूर्ण ।। महाराजांचा तो असेची ।।५०।। वेश्येनें महाराजां उच्चासनी ।। बैसविले तेंव्हा आदर करूनी ।। तो मोलकरीण येऊनी महाराज चरणी ।। सद्भावेची लागली ।।५१।। महाराजांनी तीशी न्याहाळीले ।। मग प्रेमेची त्या वेश्येशीं बोलीलें ।। येवढी ऑबा ही देतीस काग म्हणाले ।। ती म्हणें महाराज न्यावे आताची ।।५२।। महाराज म्हणती आनंदी माई ।। येतीस काग बोल हो की नाही ।। ती म्हणें मी आताची या पायीं देह अर्पण केलासे ।।५३।। महाराज म्हणती आता नको येऊ ।। आम्ही तुला ते बोलावणें पाठऊ ।। घरादाराची तुझ्या त्या वाट लाऊ ।। मग यावे तु स्वानंदे ।।५४।। पुढे चंद्रा वेश्या ती निवर्तली ।। आनंदी आता निराश्रीतची जहाली ।। निरूपाय म्हणोनी व्यवसायीं पडली ।। घृणीत आशा त्या वेश्येच्या ।।५५।। मग सिंदगांव पांग्रा येथे राहून ।। व्यवसाय करीती इच्छा नसोन ।। अपार सोनें

नाणें ते द्रव्य मेळऊन ।। गृह एक बांधीले स्वयेचि ।।५६।। कधी महाराजाचा आठव होता मनी ।। आश्रु वाहती खळखळा नयनीं ।। म्हणें बोलाऊ नये ते कैसी करणी ।। करावी आतां यापुढे ।।५७।। महाराज ते अंतर्ज्ञानी ।। माईची तळमळ ती ओळखली मनीं ।। मग लाल बहादुर या शिष्या लागुनी ।। बोलाऊ पाठविती तात्काळ ।।५८।। तो सायंकाळ समयी द्वारी येऊन ।। माईस सांगे निरोप पूर्ण ।। महाराज बोलाविर्ती तुज लागुन ।। देऊळगांवी ते आताची ।।५९।। निरोप मिळताची घरदार विसरली ।। शिष्यासवे ती तात्काळ निघाली ।। कडी कुलूपही द्वार त्या नाही लाविली ।। देऊळगांवी आली तीं तैशीच ।।६०।। महाराजा पहाता समोर ।। नयनी वाहती आश्रुपूर ।। तैशीच मग ती चरणावर ।। येऊनीया पडलिसे ।।६१।। महाराज तीशी उठविती प्रेमेंकरून ।। आलींस काग म्हणती चालून ।। अग घराशी त्यां कडी कुलूप न लाविताची जाण ।। कैसी आलीस तू रात्रीया ।।६२।। तदाकार वृत्तीती जहाली पाहून ।। रात्री घेतले तेथचि ठेऊन ।। देहादिकाचेहा नसे त्या माईस भान ।। तेथे गृहद्रव्यादि कायसे ।।६३।। दूसरीये दिनी महाराज उठोन ।। आनंदीमाईस म्हणती तूं बाईगे परतोन ।। घरा दाराची ती व्यवस्था पूर्ण ।। लाऊन यावे तू माघारा ।।६४।। आता कैचे ते घरदार ।। अवघा गुरूदत्त भरलासे साचार ।। परीं आज्ञा तुमची असे ती थोर ।। म्हणुनीया तात्काळ निघाली ।।६५।। येऊनीया गृहाशीं पाहीले ।। तो रात्रीच जळुनीया ते भस्म जहाले ।। पहाता तीशी ते हासु आले ।। तैसीच फिरली ती माघारा ।।६६।। मनीं म्हणे दत्त गुरूनी कृपा केली ।। सर्व पातकाची ती जहाली होळी ।। आता गुरूकृपेची ती

साऊली ।। लाधली असेचि प्रारब्धे ।।६७।। या परी गुरू माऊलीचे करीता चिंतन ।। येऊनी महाराजा करी वंदन ।। महाराज म्हणती तीज लागून ।। आता तू निर्मळ जहालीसे ।।६८।। ती म्हणे चरणीं लागून ।। उगीच मज ते पाठविले परतोन ।। रात्रौ तुम्हीच ती व्यवस्था करून ।। शुद्धीकरण माझे ते केलेसे ।।६९।। आता या गुरूचरणाविण ।। मज न दिसे ते काहीच आन ।। महाराज म्हणतीं ते तुझे घरदार सुवर्ण ।। सर्वचि ते भस्म जहाले ।।७०।। असो आता तूं जगाची माई होऊन ।। गुरूचरणीं त्या व्हावे सदा विलीन ।। तुझेच होईल ते सर्व सुवर्ण ।। गुरू कृपा ती जहालीया ।।७१।। महाराज एकदां टेंभुर्णीस येतां ।। चोहीकडे ती पसरली वार्ता ।। असंख्य समुदाय तो एकदाची लोटता ।। अपार गर्दी ती जहालीसे ।।७२।। सर्वाचे होता ते दर्शन ।। महाराज म्हणती प्रतीष्ठिता लागून ।। काही दत्तासाठी ती सावली कराया म्हणून ।। कोठे जागा ती देता का आम्हाशीं ।।७३।। प्रतीष्ठीन मंडळीपुढे होऊन ।। गावच्या पश्चिमेस दिधली जागा दाऊन ।। त्या ठाई मग दत्त मुर्ती स्थापून ।। मंदीरही ठाई त्यां उभारिले ।।७४।। यात्रा उत्सवादी सर्व कांही ।। प्रतीवर्षी होतसे सवही ।। संत सामर्थ्याचा तो अंत नाही ।। महिमाची असे हा अद्भुत ।।७५।। देशमुखा घरी ते करीता सुरापान ।। गणपत भटजी ते आले बाहेरून ।। महाराज म्हणती या या भटजी तीर्थ घ्याहो आपण ।। बरा आलांत वेळेशीं ।।७६।। भटजी म्हणती ते आम्हा लागून ।। चालत नाही हा कधी म्हणून ।। सुरेची बाटली पुढ करून घ्याहो घ्याहो म्हणताती ।।७७।। मग प्याल्यामाजी ती बाटली ओतून ।। प्रत्यक्ष दूध दाविले सकळा लागून ।। आश्चर्य चकित ते भटजी

होऊन ।। चरणी मस्तक ठेविले ।।७८।। उपदेश मग तो पुढे घेऊनी ।। सदा लागले ते महाराज भजनीं ।। आणिक उपदेश तो येथे कोणी ।। घेतला प्रसंगेची वर्णू त्यां ।।७९।। संत महिमा तो आहे कठिण ।। परी वदविता असे त्या रूक्मिणीरमण ।। संत लीलेचि त्यां आवडी पूर्ण ।। प्रसिद्ध असे ते सर्वचि ।।८०।। संत असती नित्य जागृत ।। देवापासून नसति ते कधी विभक्त ।। आडमार्गी जाता ते अज्ञानीया त्वरीत ।। सन्मार्ग निजकृपेची दाविती ।।८१।। एकदां माई म्हणें महाराजाला ।। शेवायाच खाव्या हो वाटते मला ।। महाराज म्हणती वासना खोटी माई तीला ।। आळा घालावा लवकरी ।।८२।। पुढे पावन वडगांवी माईस घेऊन ।। महाराज आले आपण होऊन ।। शेवाया खायची ती आठवण ।। सहज जहालीसे महाराजा ।।८३।। मग बंडेराव जोशी यास बोलाऊन ।। शेवायाच सांगितल्या त्यां कराव्या म्हणून ।। आम्ही आणि माई खूप खाऊन ।। करू ती मौज वासनेची ।।८४।। बंडेराव तात्काळ घरी येऊन ।। शेवाया करविल्या पातेले भरोन ।। मग पाट थाट रांगोळ्या त्या काढून ।। पात्रे वाढीली ती सर्वाची ।।८५।। जोशीबुवा आले महाराजा जवळी ।। चला म्हणती वाढील्या पत्रावळी ।। मग महाराज आणि माई एकमेका जवळी ।। येऊनी बैसली भोजनां ।।८६।। महाराज म्हणती हा केवढा थाट ।। उदबत्याचा असे घमघमाट ।। माई तूं कंबर कसून बैस निट फन्ना उडऊया त्या वासनेंचा ।।८७।। माई आज की नाई सेवायाच खाऊ ।। अन्य पदार्थ तूं हात नकोची लाऊ ।। पात्रीची संपताच पुन्हा घेऊ ।। म्हणुनी प्रारंभ केलासे ।।८८।। मग बाह्या त्यां सारूनी वरती ।। महाराज भरभरा शेवयाच खाती

।। माईसही सेवायाच खा म्हणती ।। वासना ही सर्पीन असेग ।।८९।। एका शेवाया वाचून ।। महाराज न सेवींतीं दुसरे अन्न ।। माईस म्हणती खाय तूं पोटभरून ।। वासनें लागी दवडाया ।।९०।। शेवाया खाताखाता यापरी ।। वांती जहाली ती पात्रावरी ।। तैसाची ओक तो भराभरी ।। खाऊ लागले महाराज ।। प्रकार पाहून हा कीळसवाणें ।। महाराजाचा हात धरीला माईनें ।। नका नका आता पुरे हें खाणें ।। म्हणुनीया चरणी लागली ।।९२।। माईस महाराज म्हणती ।। वासना दुष्ट आहे ती अती ।। तीच्या संगतीने ते जन्मकीर्ती ।। जहाले ते आम्हां कळेना ।।९३।। माईस पश्चात्ताप जहाला ।। बळी पडले होते मी वासनेंला ।। धन्य गुरूमाऊली वेळीच घातला आळा ।। म्हणुनीया पुन्हा चरणी लागली ।।९४।। असो बाबा दिवाळकर हे महाराज भक्त ।। देऊळगांवी राहती ते सतत ।। महाराजा म्हणती झोपडे करूनीया मळ्यांत ।। राहू तेथेचि सर्वदा ।।९५।। तोची माई मध्ये पडून ।। बाबा म्हणती तैसेची करू हो आपण ।। किती हो महाराज फीरावे वनवन ।। अंतचि नसे त्यां फीराया ।।९६।। बरं ह्या लोकांनी तरी सांगा कोठवर ।। फिरावे मागे मागे ते निरंतर ।। गुरू इच्छा म्हणुनी महाराज रूकार ।। देऊनी वचन मानीती ।।९७।। मग विस्तीर्ण झोपडी घातली मळ्यांत ।। भजनी मंडळीही येती तेथे समस्त ।। बाबा म्हणती मळा आहे हा झगड्यांत ।। सुटताची अर्पण करू हो निश्चये ।।९८।। पुढे मळा तो बाबाचा सुटला ।। बाबानेही महाराजा अर्पण केला ।। खंजीरी भजनाचा तो नित्य सोहळा ।। रात्री सर्वदा चालेची ।।९९।। तेथेची मग दत्ताची स्थापना केली ।। विहीर एक बाबाने बांधून दिली ।। परी वाटेती हुरहुर मनां

सगळी ।। की कैसा हा मळा मी घालविला ।।१००।। मग एकांतीं ऐसा तो विचार केला ।। महाराज कां घेऊन जाणार आहेत मळां ।। पुढे मागे तो असेचि आपुला ।। व्यर्थही तळमळ कासया ।।१०१।। तोची दुसरीये दिनी महाराज बोलीले ।। बाबा तुम्हीच सांभाळा बुवा हे सगळे ।। दक्षीण भागी मग ते जाऊनीं बैसले ।। झोपडीही तेथेचि बांधली ।।१०२।। तेथेही मिळती भाविक जन ।। भजन पुजनादि चाले रात्रंदिन ।। पुढे तेथेचि दत्त मुर्ती स्थापून ।। मठ एक स्थापन केलासे ।।१०३।। प्रथम महाराज टेंभुर्णीस राहीले ।। दत्त मंदिरादी काम चालू केले ।। उर्जीत दशेस येता तेथूनी निघाले ।। देऊळगांवी राहीले मग येऊनी ।।१०४।। साशंकित जहाले ते श्रोतेजन ।। टेंभूर्णीहून निघाया काय कारण ।। तरी विस्कळीत जहाले कां जेथीचे मन ।। स्वार्थ साधवा तो म्हणोनी ।।१०५।। जेथे जेथे यापरी अनुभवा आले ।। तेथे तेथे महाराज सोडुबी जाती सगळे ।। याच रीती देऊळगांवाहुन निघाले ।। येऊनी राहीले त्यां वाडीस ।।१०६।। एकदा कुंभेफळाहुनी निघोन ।। महाराज राहीले गोंदेगांवीं येऊन ।। आण्णा साहेब ती कीर्ती एकुन ।। दर्शना निमित्तचि पातळे ।।१०७।। आण्णाशी पहाता या म्हणति मास्तर ।। आम्ही शाळेत शिकलो नाही बुवा कधी एकाक्षर ।। रानोमाळ फीरतो आम्ही नीरंतर ।। गुरूचं नांव ते घेतो सदा ।।१०८।। आण्णा म्हणती तेचि येई ना आम्हाशी ।। न सुचे तो उपाय काही त्याशी ।। म्हणोनी पातलो या चरणाशी ।। कृपा ती व्हावी म्हणोनीया ।।१०९।। महाराज म्हणती आम्ही देऊळगांवी येऊ ।। तेव्हां काय ते मग पुढे पाहु ।। दोन पेढे हे आता तुम्हाशी देऊ ।। नेंऊनीया द्यावे ते

माईशी ।।११०।। प्रसाद मिळताची नमस्कार करूनी ।। तंद्रीमाजींच ते आले आपुले सदनी ।। प्रेमळ पत्नीशी त्यां सविस्तर सांगुनी ।। प्रसाद तो दिधला ।।१११।। प्रसाद करीताची तात्काळ ग्रहण ।। बाई म्हणें उदयीक जाऊनी घेऊ दर्शन ।। पुढील अध्यायी तेची कथन ।। येईल तेची परीयेसा ।।११२।। संत चरित्राची ती महती ।। वदविता असे तो रूक्मिणी पती ।। वासुदेव हा निमित्त त्या निश्चिती ।। विश्वास मानसी असोद्या ।।११३।। इति श्री आत्मानंद चरित्रसार ।। चतुर्थोध्याय: ।। श्री कृष्णार्पणमस्तु ।। हरयेनम: ।। हरयेनम: ।।४।। ।।४।। ।।४।। ।।४।। ।।४।।

श्री गणेशायनमः ।। श्री सरस्वत्यैनमः ।। श्री गोपालकृष्णायनमः ।। जय जयाजी अभिनंदना ।। गोकुळवासीया मनमोहना ।। विश्वव्यापका मधुसुदना ।। विश्वात्मका विश्वपते ।।१।। तूं असोनिया निर्गूण ।। मायेच्या आश्रये तुज म्हणती सगुण ।। अकाराशी ते साकार जाण ।। इचे नियोगे भगवंता ।।२।। या परी माया ही अति दुस्तर ।। सुचोनेदि काही तो विचार ।। विचार नाही तो दुःख अपार ।। भोगणें लागे सहजची ।।३।। तुझी ती कृपा जहालीयावरी ।। मग मायेची असे ती काय थोरी ।। दीन दयाळा तूं येऊनी श्रीहरी ।। पुढे चरित्र बोलवीं ।।४।। रूख्मिणीबाईस प्रसाद देतांची जाण ।। तीनें तो केला तात्काळ सेवन ।। मग पतीशी म्हणें ती उदयीक आपण ।। दशना जाऊ हो मागुता ।।५।। गताध्यायी जहाले ते एवढेचि कथन ।। पुढ ती गेले ते पायीच चालून ।। घेतले महाराजाते तात्काळ दर्शन ।। महाराज म्हणती माई तू पायीच येऊन ।। कष्ट कितीहे साहीले ।।६।। बाई म्हणें तुमच्या दर्शने करून ।। निर्मळ जाहाले ते आमूचे मन ।। आता आपुले हे सोडोनी चरण ।। न जाऊ हो आम्हीं सर्वथा ।।७।। निर्धार उभयताचा तो पाहुनी ।। गुरूमंत्र दिला तो महाराजानी ।। म्हणे वाडीस माईच्या त्यां भेटी लागुनी ।। येत असा हो सर्वदा ।।८।। पुढे आन्नासाहेब येती जाती ।। श्रद्धा ती जडली महाराजावरती ।। परीवारामाजी पुत्र कलत्र आपण असती ।। मठी येती त्यां साक्षेपे ।।९।। आनंदी बाईने सर्वत्र भिक्षा करून ।। मठाचे काम ते केले संपूर्ण ।। आण्णा ही पुढे ईन्सस्पेक्टर होऊन ।। राहीले तेथेची सर्वदा ।।१०।। मठ उत्तम बांधून काढीला ।। मोठा वाडाहि मग तेथे केला ।। आनंद वाडीच म्हणती लोक त्याला ।।

आजही प्रत्यक्ष असे की ।।११।। आण्णाने संसार तेथेचि थाटीला ।। कारभार पाहे तो दत्तात्रय सगळा ।। आण्णाचेहि मनीं तो विकल्प आला ।। महाराज सर्व ते जाणती ।।१२।। म्हणती आण्णा तुम्हीच हे सर्व सांभाळावे ।। आम्हास वाटे ते आता येथुनी जावे ।। पुढे व्यवस्थीत हे सर्व चालावे ।। सांगुनी निघाले तात्काळ ।।१३।। सुळकीकडे येताची वरूडापाशी ।। चिमाजी पाटील भेटले महाराजापाशी ।। काही पाटील थोडी जागा देता का आम्हाशीं ।। चिलीम ओढताची बोलीले ।।१४।। तो म्हणे नाही बुवा येथे जागा नाही ।। महाराज निघाले तात्काळ तेथुनी पायीं ।। तोची बाबा देवाशी दृष्टी देखता पाही ।। मध्येच थांबले शेतीं त्यां ।।१५।। बाबास वाटले भाग्योदय जहाला ।। दंडवत घातीले महाराजाला ।। गुरूमंत्राचा संकेत मनी केला ।। परी बोलवेना काही किंचित ।।१६।। वरूडचे नाकेदार भाऊआदि मंडळी ।। महाराजास पहातची आली जवळी ।। महाराज म्हणती बालासाहेब आणावा वाटे या स्थळी ।। परी नागवेचि आम्ही सर्वदा ।।१७।। जागा न मिळे कोठे किंचित ।। कैसी करावी आता गत ।। गुरूमंत्र घ्याया इच्छिती समस्त ।। परी न देती जागा कोणीहि ।।१८।। बाबाच्या शब्द मनी लागला ।। म्हणती एवढा आहे हा आपुला मळा ।। गुरूचरणी मी हा अर्पण केला ।। समस्ता आजी कळोद्या ।।१९।। परीसताची ऐशा त्या बोला ।। महाराज म्हणती मग बालासाहेबाला ।। आणुनी करू तो स्थापनेंचा सोहळा ।। विलंब तो न करीताची किंचित ।।२०।। मग बालासाहेबाच्या नामे करूनी गजर ।। श्रोटा एक केलासे सत्वर ।। व्यंकटेश मुर्ती ती बाबाचीच साचार ।। आणुनी ओटच्यावरी स्थापिलीं ।।२१।।

निशान झेंडा तो तेथेचि लाविला ।। इकडे आण्णा माई ते महाराजाला ।। धुंडीत आले ते याची स्थळा ।। देखुनीया दंडवत घातिले ।। महाराज म्हणती आनंदी तू होऊन ।। आलीस येथे पहा राहु आपण ।। बालासाहेब आपल्यासाठी येथे येऊन ।। काल पासुनी बैसला ।।२३।। माई म्हणे हो महाराज  हे असे कसे ।। खरेच लागले तुम्हा पिसे ।। बरं चला जाऊं आता आले तसे ।। बालाजीस नेंऊ हो सांगाती ।।२४।। महाराज म्हणती नाई नाई ।। बालासाहेब जायला आला नाही ।। काही बाबादेव सांगातरी तुम्ही काही ।। जावया आला काही बालाजी ।।२५।। बाबादेव म्हणती आता खरेच काही ।। बालाजी येथून जाणार नाही ।। जयजयकार करीती मग ते सर्वही ।। एक्या स्वरेचि सारीखां ।।२६।। निरूपाय म्हणोनी  सर्वचि गेले ।। महाराज माई हे तेथेचि राहीले ।। आनंदी माई की जय म्हणुनी गर्जले ।। महाराजासह ते एकदाची ।।२७।। विश्रांती मठ म्हणुनी त्यां नांव ठेविले ।।  सर्वचि मग तेथे राहू लागले ।। आजहि सर्वतो मुखी हे नांव झाले ।। विदित असे जे समस्तां ।।२८।। पुढे महादेव गणपती दत्ताची स्थापना ।। मंदिरे उभारिली मग ती याची स्वाणा ।। साळोजी दादा हरिसावजी आदि लोकांनां ।। क्षेत्रची हे होऊनी बैसले ।।२९।। भजनी मंडळी तैसे ते संत भक्त ।। विश्रांती मठां ते येती समस्त ।। खंजीरी भजनाचा तो आनंद सतत ।। नित्य होतसे मठी या ।।३०।। बाबा देवाचा मळा होता गहाण ।। माईनें  तो घेतला पुढे सोडून ।। मठाचे ते वाढले तेव्हा उत्पन्न ।। दिवसे दिवस सारीखे ।।३१।। पुजेचा अधिकार तो महाराजानी ।। बाबास दिधला वंशपर परेनी ।। उत्सवादी व्यवस्था सर्व लाऊनी ।। महाराजही येथेचि राहीले

।।३२।। भीक्षा आणोती चोहिकडोन ।। मागुता राहती मठी येऊन ।। महाराज ते स्वस्वरूपी सदा निमग्न ।। राहुनी वर्तती सर्वदा ।।३३।। देवादिकाशी जे अशक्य काहीं ।। संत ते करूनी दाखविर्ती पाहीं ।। जे विषयी वृत्तांत तुम्हां तो सर्वही ।। सांगेण तोची परीयेसा ।।३४।। आबासाहेब कुळकर्णी नामे करूनी ।। प्रतीष्ठीत गृहस्थ असे त्यां टाकरवनी ।। मंत्र मिळावा तो महाराजा कडूनी ।। इच्छित मानसी सर्वदा ।।३५।। एकदा सदानंद महाराजां भेटून ।। म्हणें महाराजा यावे येथे घेऊन ।। सदानंद म्हणती ते कांही निमित्या विण ।। येणें अशक्य सर्वथा ।।३६।। तुम्ही दत्ताची स्थापना कराल जरी ।। तरी महाराजा आणु ते येथवरी ।। माई ही येईल बरोबरी ।। आनंद तो होईल सर्वचि ।।३७।। आबा म्हणती करू दत्त स्थापना ।। घेऊन यावे हो महाराजाना ।। मग व्यवस्था सर्व ती करूनी जाणा ।। आमंत्रण दिधले ते महाराजा ।।३८।। स्थापनेंचा दिवस तो उदेला ।। सदानंद आणती महाराजाला ।। असंख्य समुदाय तो जमा जहाला ।। सोहळा हा सर्वत्र होतसे ।।३९।। आता ऐकावे सावधान ।। आबास तो पुत्र असे एकचि जाण ।। तोहि कितीएक त्या दिवसा पासोन ।। रोगग्रस्थ जहालासे ।।४०।। दत्त स्थापनेंचा तो सोहळा ।। यथाविधी पार पडला ।। सकळाशी तो आनंद जहाला ।। एकसरेचि सारीखा ।।४१।। मंडपी घातील्या पत्रावळी ।। पंच पक्कान्नाची ती बाहाड जहाली ।। इकडे प्राण ज्योत ती मालवली ।। आबाच्या त्यां पुत्राची ।।४२।। वार्ता ही न कळावी कोणा म्हणून ।। गृह ते टाकिले बंद करून ।। आधी उरकावे म्हणतीं हें भोजन ।। नातरी घात होईल व्यर्थचि ।।४३।। न कळे वार्ता ही कैसी कोणी ।। सांगितली त्या

माईस येऊनी ।। कापऱ्या स्वरेचि मग ती महाराजा लागुनी ।। सांगे एकांतची बैसुनी ।।४४।। महाराज म्हणती हे बरं नाही झालं ।। आबाचं पोर कसं ते या वेळीच मेलं ।। आमच मन तर बुवा घाबरून गेलं ।। उपाय तो यासी कळेना ।। ४५।। माई म्हणें महाराजा येथून ।। आपण यावे ते आताचि निघून ।। महाराज म्हणती नाई नाई कसे ग तुझे हे मन ।। उपाय बरा हा दिसेना ।।४६।। लोक काय म्हणतील आपणाला ।। की रंग्यातो आता पळून गेला ।। पुढे पुसणार नाही मग या दत्ताला ।। विपरीत सर्वचि होईल ।।४७।। माई तूं आता देवास म्हणून पहाय ।। ते काढतील काहीतरी उपाय ।। तोचि देव आले तेथे अपटीतची पाय ।। येऊनी सचिंत बैसवी ।।४८।। देवास माई हलकेच म्हणती ।। कसं हो झालं देवा हे विपरीत अति ।। तुम्ही काहीतरी करावे महाराज म्हणती ।। म्हणुनीया चरणी लागली ।।४९।। देव म्हणती उठ सटवे तूच कर न काही ।। महाराज म्हणती देवा तसं नाई नाई ।। तुम्हीच पोर ते उठवावे लवलाही ।। दत्त म्हणोनी आताची ।।५०।। महाराजाची ती आज्ञा होताचि जाण ।। सदानंद महाराज उठती खडबडोन ।। द्वाराचे कुलुप ते तात्काळ काढून ।। प्रेता जवळी गेले त्यां ।।५१।। मग गुरूमाऊलीचे ते ध्यान करूनी ।। बाप्या तूं उठ म्हणती आता येथुनी ।। तुप कोणी वाढावेरे तुझ्या बापानी ।। म्हणनींया लात मारीली ।।५२।। अघटीत असे ती संतलीला ।। बापु तो खडबडुन केंव्हाच उठला ।। तुप घेऊनी मंडपी आला ।। वाढु लागलाची तात्काळ ।।५३।। ऐशी देखताची विचित्र करणी ।। बापाचा आनंद न माये गगनी ।। आनंदाश्रु वाहती नयनातुनी ।। शब्द तो मुखी नयेची ।।५४।। रंगनाथ महाराज

असती ज्यां स्थानीं ।। बाबासाहेब आले ते तेथे धाऊनी ।। लोटांगण घातीले ते महाराज चरणीं ।। स्फुंद स्फुंदोनी रडताती ।।५५।। मग आबास उठविती धरूनी कर ।। म्हणती देव मोठे आधिकारी आहेत बरं ।। तुम्ही त्यांचाच उपदेश घ्या आता सत्वर ।। कावं माई आसचना ।।५६।। आम्हीं तो घाबरलो होतो बुवा मनीं ।। परीं लाज राखीली सदानंद महाराजांनीं ।। बोलो सदानंद महाराज की जय म्हणुनी ।। समाधान आबाचे ते केलेसे ।।५७।। आज्ञे परी तो त्यांच दिनी ।। देवाचा मंत्र घेतला आबानी ।। दत्त नामाचा तो गजर करूनी ।। सोहळा संपूर्ण केलासे ।।५८।। महाराज माई निघती तेथून ।। विश्रांती मठा आले ते परतोन ।। दिवसे दिवस महाराजाची कीर्ती वाढून ।। दर्शन ते इच्छिती सर्वचि ।।५९।। बालय्या नामे स्टेशन मास्तर ।। किर्ती ऐकुनी आलासे मठावर ।। अनुग्रह हाताचि बालानंद स्वामी साचार ।। होऊनी येथेची राहिला ।।६०।। रामा सावजी चांडोळकर ।। महाराजावरी ज्याची श्रद्धा अपार ।। तो नित्यचि येई त्यां मठावर ।। दर्शनालागी साक्षेपे ।।६१।। महाराज म्हणती सावजी हे कसंहो झालं ।। चोरानीं माईला सर्वच लुटलं ।। सोनंनाण पहा सगळंनेंलं ।। नागव करून ठेवलं माईशी ।।६२।। माई म्हणें या चरणापुढे काही ।। सोन्याची त्यां कींमत नाही ।। आता घरदार सर्वच काही ।। चरण एक ते आपुले ।।६३।। सावजी म्हणती या गुरूकृपेनं ।। सर्वच होईल माई सोनंच सोनं ।। या परि प्रेमेचि परस्पर बोलून ।। महाराजासह आले ति चांडोळां ।।६४।। तेथे मथुरावासी एक ब्रह्मचारी ।। येऊन बैसला होता आधीच घरी ।। हनुमानदास चौबे त्यां म्हणती साचारी ।। सर्वत्रचि नामे या ।।६५।। महाराज

ब्रम्हचारी यासी देखता ।। सावजीस म्हणती पुसावे साधूसंता ।। आमचे भाग्य मोठे बुवा म्हनुनी आता ।। दर्शन जहाले साधुचे ।।६६।। ब्रह्मचारी येऊनी चरणी लागला ।। म्हणें भाग्याचा दिवस तो आजी उदेला ।। दत्त गुरू हा जगी कैसा भरला ।। निज दृष्टि ती आजी देखीला ।।६७।। महाराज म्हणती आम्हीं हे असे ।। जात ना पात ती आम्हासी दिसे ।। शिळे पाके जे का मिळेल तसे ।। खाती रस्त्यावर बैसुनी ।।६८।। ब्रह्मचारी म्हणें तुम्हा ऐसे व्हावया कारण ।। आम्ही फिरतो सदा रानोरान ।। आज महाराज तुमचे दर्शन मात्रें करून ।। प्रकाश अंतरी पडलासे ।।६९।। असो महाराजाचा मुक्काम चांडोळा ।। चार दिवस तो तेथेची राहीला ।। सर्वालागी तो आनंद जहाला ।। एक सरेचीं सारीखा ।।७०।। दिडशे भार सोन्याचे दागिने केले ।। तीतके माईच्या अंगावर घातिले ।। महाराज म्हणती माईचे सर्व सोने जहाले ।। बोलो आनंदी माईकी जय ।।७१।। ऐशा आनंद गजरामाझारी ।। परतोन आले मठावरी ।। तो धोंडीराम पोद्दार पिरवाडीचा घरीं ।। आधीच येऊनी बैसला ।।७२।। मंत्र मिळावा ही इच्छा फार ।। परी न बोलवे महाराजा समोर ।। रात्रौ कडाक्याची ती थंडी अपार ।। पडली त्या अंत नसेचि ।।७३।। अंधारातची महाराज उठले ।। तो शेकोटी जवळी धोंडीरामा देखीले ।। तापल्या विटा त्यां घ्यावया आले ।। शेकोंजी जवळी तात्काळ ।।७४।। कोण कोठील महाराज ते पुसती ।। धोंडीरामाने सांगितले ते सर्व प्रिती ।। महाराजही त्यां सहज म्हणती ।। वीटा त्या देता का काढुनी ।।७५।। मोठा चिमटा मग तो घेऊन ।। विटा त्या दिधल्या सर्व काढून ।। विटा देताची त्या शाबास म्हणून ।। देतो बुवा

गुरूमंत्र म्हणें तुम्हाशी ।।७६।। तोंड धुऊनीया म्हणे सत्वर ।। धोंडीराम आनंदला मनी फार ।। मग येऊ नी महाराजा समोर ।। मंत्र घेतला तो तात्काळ ।।७७।। असो शेलगांवी गणपतराव नामे गृहस्थ ।। महाराजाचे ते असती नीस्सीम भक्त ।। एकदा गोपाळ नामे तो तयाचा सुत ।। मरणोन्मुख जहालासे ।।७८।। निज पुत्राची अवस्था पाहून ।। म्हणें जरीका उठला हा याचेतुन ।। तरी महाराजा केलासे अर्पण ।। संकल्प या परी तो केलासे ।।७९।। महाराज ते अंतरज्ञानी पूर्ण ।। पुत्र उठला असे त्या आजारातून ।। भग महाराजाते तात्काळ गृही आणून ।। वृत्तांत सर्वचि कथीयेला ।।८०।। पुत्राचे भारोभार मिठाई आणा म्हणती ।। मग पुत्राशी त्या मांडीवरी घेती ।। मिठाई ती वाटीली समस्तप्रती ।। एकसरेची सारखी ।।८१।। गणपतराव ठाकती कर जोडूनी ।। महाराज म्हणती ते त्या लागुनी ।। पांचशेर मिठाई ती आण मोजुनी ।। मागुता पुत्र हा घेईका ।।८२।। म्हणें पुत्र आमुचा हा घेऊन ।। सांभाळ करावा तुम्हीच येथुन ।। मिठाई ती म्हणती द्या वाटून ।। मग पुत्र पित्याजवळी दिधला ।।८३।। पहा संत कृपेचे ते महीमान ।। ब्रह्मदिकाही न कळे ते जाण ।। पुढे महाराजाचि ती पूर्व कृपा म्हणून ।। दोन पुत्र जहाले तो मागुता ।।८४।। गणपतराव असती सांत्वीक पूर्ण ।। वेणूबाई त्या पत्नी लाधलीसे गुण संपन्न ।। महाराजाचे चरणी उभयताचे मन ।। एकसरेचि लीन सर्वदा ।।८५।। गोपाळ दुजा तो विष्णु म्हणुनी ।। तीसरा तो सांभ असे त्यां दांपत्या लागुनी ।। पुढेही परीवार समस्ताचा वाढोनी ।। सुखी ते सर्वदा संसारी ।।८६।। गोपाळराव आधीच संतकृपेचे फळ ।। यमुनाबाई त्या पत्नी लाधली सुशील ।। उभयताचा भाव महाराजावरीप्रेमळ

।। सर्वदा असे तो संसारी ।।८७।। संताच्या त्या दृष्टिक्षेपे करून ।। अधर्मीही होतो धर्मवान ।। ये विषयी वृत्तांत परीसा येथून ।। जेणे विकल्प जाय नासोनी ।।८८।। महाराज औरंगाबादेस निघते वेळी ।। पांच सहा दमन्या त्यां होत्या जवळीं ।। समागमें ती होती शिष्य मंडळी ।। माईसहित सर्वहि ।।८९।। शेकटच्यास येताची सर्व थांबले ।। नव्हती शिबळ एकादी आणाया गेले ।। महाराज उतरूण एका बाईकडे आले ।। म्हणती मज भाजी भाकर देईका ।।९०।। बाई ती होती जरा विचित्र ।। म्हणे भाजीना येथे भाकर ।। महाराज म्हणती भाकरी कोरभर ।। वांग्याची भाजी देईका ।।९१।। ती पुन्हा म्हणें भाकरी नाही ।। महाराज म्हणती थोडी तरी देई ।। मग शीव्याचा तो भडीमार पाही ।। एकसरेची चालीला ।।९२।। शेवटी भाजी भाकर तिज पासून ।। घेऊन खाल्लीती तेथेचि बैसून ।। पाणी ते ओंजळीनें तेथेचि पिऊन ।। ढेकर तो दिधला तेथेचि ।।९३।। इकडे मंडळी महाराजां पहाती ।। लोकही जमले दर्शना प्रींती ।। महाराज ते निघाले सत्वर गती ।। येऊनी पोहचले त्या करमाडा ।।९४।। तीकडे सर्वत्र बोभाटा जहाला ।। कीं बाईनें शिव्या दिल्या त्या महाराजाला ।। नवराही तीचा तो रागास आला ।। पश्चात्ताप जहाला बाईते ।।९५।। मग पुरणाचा तो स्वयंपाक करून ।। सहा मैल आले त्यां करमाडी घेऊन ।। पती पत्नी ते उभयता पुढे होऊन ।। महाराज चरणीं लागती ।।९६।। महाराज बाईशी उठविती ।। पुरण पोळीचा घास मुखीं घालिती ।। नित्य थोडातरी धर्म करावा म्हणती ।। तरीच सार्थक जन्माचे ।।९७।। पुढे काही तो धमकेल्याविण ।। बाईचा न जाय तो एकदिन ।। ऐशारिती अधर्मी ती धर्मवान ।। संत

कृपेची त्यां जहाली ।।९८।। अगाध असे तीं संत लीला ।। एकदा गोंदेगांवी मुक्काम पडला ।। महाराज म्हणती त्या पाटलाला ।। वांगी ती थोडी आणा बुबा ।।९९।। पाटील म्हणती मी परवाच लाविले ।। अद्याप वांगे त्यां नाही आले ।। महाराज म्हणती काहीतरी बोलत आपुले ।। अहो पाहून पाहून आणा कीं ।।१००।। केवळ आज्ञा म्हणून ते शेती गेले ।। पहातात तो भाजी पुरते वांगे निघाले ।। महाराजा आणून तात्काळ दिधले ।। चरणी माथां ठेऊनी ।।१०१।। असो आबासाहेब नाना हे बंधुजाण ।। शिवण्यामाजी असती कर्मीष्ट दोन ।। आबाशी तो अधिकार पूर्ण ।। आचार्य पिठाचा तो असेचि ।।१०२।। हरीदिनीस एकदा ते महाराज आले ।। आबासाहेब पुजेमाजी होते सोवळ ।। वार्ता कळताचि ते तेथे आले ।। घेऊनीया आले ती महाराजा ।।१०३।। महाराज म्हणती कीती हे सोवळे आर्चन ।। एकदशी व्रतादी पाळीता पूर्ण ।। आम्हाशी ती जात पात म्हणून ।। कळत पाही बुवा आजवरी ।।१०४।। आम्ही बाटके कोणाचेही खातो ।। गुरूचा प्रसाद काला तो नेहमी करीतो ।। शिवु नका आम्हा विटाळ होईल तो ।। कांव माई सांग तू असच ना ।।१०५।। आबा म्हणती सारा खटाटोप येवढ्याच करीता ।। तुमच्या सारखे आम्ही केव्हा व्हावे आता ।। सर्वत्र गुरूमाऊली ही दृष्टि तत्वता ।। केव्हा होईल आम्हाशी कळेना ।।१०६।। महाराज माईस म्हणती प्रसाद काला कहाडन ।। माईनं फुटाने रेवड्या ठेविल्या काढून ।। महाराज खाती मीटक्या मारून ।। गुरूचा काला आहे म्हणती आबा हा ।।१०७।। आबा नाना पुढे हात करून ।। द्या म्हणती महाराज आम्हा लागून ।। मग आनंदी माईकी जय म्हणून ।। प्रसाद

दिधला समस्तां ।।१०८।। जयजयकार करूनी महाराज गेले ।। आबा म्हणती द्वादशी करू येथेची सगळे ।। परी महाराज नायकती तैसेचि निघाले ।। पुढे ते येऊ म्हणोनीया ।।१०९।। पुढील अध्यायी तेची दृष्टांत ।। येतील ते परीसा देऊनी चिंत्त ।। वदविता असे तो पंढरीनाथ ।। वासुदेव त्या निमित्त असेश्री ।।११०।। इति श्री. आत्मानंद चरित्रसार पंचमोध्याय: ।। श्री कृष्णार्पण मस्तु ।। हरयेनम: ।। हरयेनम: ।। ।।५।। ।।५।। ।।५।। ।।५।। ।।५।। ।।५।।

श्री गणेशायनम: ।। श्री सरस्वत्यैनम: ।। श्री गोपालकृष्णायनम: ।। जय जयाजी लक्ष्मीरमणा ।। दुष्टजनसंहारक राजीव नयना ।। यदुकुलभुषणा कंस कंदना ।। मायातीता लक्ष्मींपते ।।१।। तू असुनीया जग निर्माता ।। निर्विकार तैसातू म्हणविसी अकर्ता ।। विलक्षण एशी ही तुझी सत्ता ।। उमज पडेना तो कवनाशी ।।२।। जवळी असुनीया तू श्रीपती ।। वायाची हींडीती तीर्थो तीर्थो ।। शेवटी मनाची मग न होता शांती ।। उदास होऊनी बैसती ।।३।। तुझी प्राप्ती ती व्हावया लागून ।। व्हावे ते आधी तुजसमान ।। तरी गवसे त्या तू नारायण ।। मतीतार्थ येथीचा एवढाची ।।४।। देवोभुत्वा यजेद्दैव, ही उक्ति ।। सत्य कैसे ते संतची जाणती ।। दिन दयाळा तू रक्मिणीपती ।। पुढे चरित्र बोलवी ।।५।। मागील अध्यायी ते कथन ।। महाराज गेले ते शिवन्या हून ।। आबासाहेब ते दिधले वचन ।। पुढे ते येऊ म्हणोनीया ।।६।। पुढे ऐकदां आबा देऊळगांवास ।। द्वादशीस होते मुक्कामास ।। महाराजांचा तो आठव मनास ।। सहजा सहजी जहालासे ।।७।। मग माणसीच निश्चय तो केला होऊन ।। म्हणती भोजन न करू ते महाराजाविण ।। पुरण पोळ्याचा तो स्वयंपाक होऊन ।। वाट पहाती सर्वचि ।।८।। ठाव ठिकाण नाही महाराजाशी ।। मग येतील हीं आशा धरावी कैसी ।। तो दत्त ध्वनी होऊनी द्वारीच म्हणती ।। ऊन ऊन पोळ्या खाऊ तुपाशी ।।९।। महाराजां पहाताची आबा उठले ।। कडकडून द्वारीच महाराजा भेटले ।। मग राहीले कोठे सोवळे ओवळे ।। जवळी बैसविती महाराजां ।।१०।। महाराज माईस म्हणती बैस जवळी ।। खुप खाय आज पुरण पोळी ।। आबाची तळमळ आम्हां कळली ।। म्हणुनची आम्ही आलो बुवा

।।११।। माई सांगन तूं आबासाहेबाला ।। आता सोवळ्या ओवळ्याचा तो झाला काला ।। सर्वच माई एक तो गुरूच भरला ।। कावं माई बोलना ।।१२।। बोलो आनंदी माई की जय, भोजन होताची महाराज बोलीले ।। आबा तुम्ही बुवा दोन्ही साधीले ।। आम्हाला देव धर्म नाही लग्नही नाई जहाले ।। तेवढं गुरूचं नांव घेतो पहा ।।१३।। महाराजाचे ते बोल ऐकुनी ।। नेत्रीं वाहे खळखळा पाणी ।। दत्त म्हणूनीया महाराज तेथुनी ।। उठले तात्काळ जावया ।।१४।। पुनश्च आबा भेटती कडकडोन ।। आश्रु वाहती ते नयनातून ।। महाराज ते केव्हाच गेले निधोन ।। विस्मय तो वाटला सकळीकी ।।१५।। असो महाराजानी जे जे करून दाखविले ।। सामान्य जीवा ते कधी ना कळे ।। गारूडी जैसा नित्य खेळ खेळे ।। तैसे नोहेचि हे सर्वथा ।।१६।। नृसिंहवाडीचे आन्ना भारती ।। केवळ वेदोनारायण हे असती ।। भारत ग्रंथ तो पाहिल्याविन सांगती ।। म्हणुनीया भारती ते म्हणविती ।।१७।। आण्णा ते देखताची महाराजाला ।। म्हणतीं भाग्योदय तो आमुचा आजी जहाला ।। महाराज म्हणती सदाचारी तुम्हीच आम्हाला ।। दर्शन दिधले बुवा कृपेचि ।।१८।। परस्पर एकमेका ऐसे बोलती ।। विनोद तैसा नित्य करीती ।। महाराज अन्नाशी ते म्हणती ।। आम्हाशी तर बुवा काही कळेना ।।१९।। आंघुळ ना संध्या पुजा कांही ।। झुब्बा टोपी शिवाय पांघरूण नाही ।। घरदार बायकु तर नाहीच नाई ।। तेवढं गुरूचं नांव घेतो कावं माई ।।२०।। बोलो आनंदी माई की जय, आण्णा म्हणता हेचि व्हावे म्हणून ।। आम्ही करीतो हे आचरण ।। तुमचा सर्वचि झाला नारायण ।। मग कर्माचरण पाहीजे कासया ।।२१।। माई आला

म्हणतात ते खर ।। गुरूच नांवच आहे ते बरं ।। देवही गुरूचं नांव निरंतर ।। घेऊनीया साधु जहाले ।।२२।। बोलो सदानंद महाराज की जय असो ज्याज्या ठाई स्थापिले मठां ।। तेथे ठेविला पाटा वरवंटा ।। भंग्या मुक्ताराम करिती भांग घोटा ।। नित्य जवळी ते राहुनी ।।२३।। भंग्या पहिलवान निवडंगा वासी ।। मुक्ताराम वळद हा जालना निवासी ।। दोघेही राहतीं महाराजापाशी ।। नित्य भांग घोटा तो कराया ।।२४।। एकदा महाराज ते पैठणी आले ।। आखाड्या जवळीच ते उतरले ।। समीपची आधिकारी यांचे डेरे लागले ।। पहीलवानी कुस्त्या त्या चालिल्या ।।२५।। एक पहिलवान शक्ति संपन्न उठला ।। त्याशी पहाता तो धक्काची बैसला ।। जोडीदार कोणी मिळेना त्याला ।। विस्मित अधिकारी ते जहाले ।।२६।। महाराजाजवळ एक साधु होता ।। दिसण्यात मोठा पण फोपशा नुसता ।। महाराज म्हणती साधुजी कुस्ती लढता?।। कायकु, म्हणे तो महाराजा ।।२७।। शेवटी तो म्हणे तुमची आज्ञा जरी ।। असेल तरी मी होतो बाहेरी ।। महाराज म्हणती फत्तें हो, म्हणताच निघाला तो सत्वरी ।। आखाड्यामाजी उतरला ।।२८।। एक फोपश्या बावळट साधुस पाहून ।। मोठ मोठ्यानी हासती सकळ जन ।। साधुने जेव्हां पहीलवान उचलोन ।। आदळले ते पाठीवरी ।।२९।। टाळ्याचा कडकडाट एकची जहाला ।। साधु तो महाराजाच्या चरणी लागला ।। समस्तां लागी तो विस्मय वाटला ।। धन्यवाद देती साधुशी ।।३०।। एकदां माई आणि महाराज मिळोनी ।। टेंभुर्णीस आले ते आपण होऊनी ।। वीदिमाजी येता त्या काहीं आरवानी ।। येऊनीया अडविले उभयतां ।।३१।। म्हणती ही तर आमची आवा

तुम्ही हिला ।। बरोबर ठेविलीती कशाला ।। मागुता म्हणती कुत्रा हा आमुचा मेला ।। दोन दिवस पहा आजी जहाले ।।३२।। इनेका जरी कुत्रा उठविला ।। तरी सोडुन देऊ हो आम्ही इला महाराज हलकेच म्हणती माईला ।। यु यु म्हण भाकरी ही दाऊनी ।।३३।। यु यु म्हणोनी टुकडे फेकीले ।। तो कुत्रे उठुनी पळतची आले ।। आरबानी त्यां उभयतां सोडीले ।। पाठी लागले त्या कुत्र्याच्या ।।३४।। महाराज हलकेच म्हणती माईते ।। चळवळ लौकर पुन्हा येऊ नाही येथे ।। बरं झालं तू जीवंत केलं कुत्र्याते ।। नातरी व्यर्थचि खोळंबा ।।३५।। महाराजाचे बोल हे ऐकुनी ।। मस्तक ठेविले माईनें चरणीं ।। आश्रु वाहती घळघळा नयनीं ।। निघोनीया मग जाती तेथुनी ।।३६।। श्रीमंत अथवा दरीद्री जाण ।। महाराजा असती समसमान ।। दृष्टांत आता तो करावा श्रवण ।। सावधान होऊनी अंतरी ।।३७।। छत्रे घराणें हे विख्यात ।। त्यामजी सर्कस वाले ते काशीनाथ पंत ।। उपनांवे त्या दादासाहेब म्हणती समस्त ।। एकदां सर्कस आलीसे या भागां ।।३८।। महाराजांची ऐकुनी ती किर्ती ।। दर्शना गेले ते मठावरती ।। दृष्टादृष्ट होता महाराज म्हणती ।। या दादासाहेब घोडे नाचविती माई हे ।।३९।। दादास विस्मय वाटला अंतरी ।। मग मस्तक ते ठेविले चरणावरी ।। महाराज उठविती दादाशी सत्वरी ।। क्षेम समाचार पुसती सर्वचि ।।४०।। दादा म्हणती माझे मन ।। गुरूचरणी ते जहाले विलीन ।। तू मी भाव मावळला पूर्ण ।। शब्द तो नयेची मुखी त्यां ।।४१।। मग वृत्तीस आपल्या सावरून ।। दादा सर्वचि सांगती महाराजा लागून ।। आता एकची इच्छा असे मनातून ।। कृपा ती व्हावी मजवरी ।।४२।। अंतरी शुद्धभाव

पाहून ।। गुरूमंत्र दिला नादा लागून ।। माई म्हणें आता सर्कस पाहू आपण ।। सर्वचि एकदां मिळोनी ।।४३।। महाराज म्हणती दादाला ।। याव का आम्ही सर्कस पाहायला ।। दादा माईस म्हणती सर्व च चला ।। मग जालण्यास आले ते सर्वची ।।४४।। महाराज आल्याची वार्ता कळली ।। अपार गर्दी ती तेथे जहाली ।। महाराज म्हणती तीकिटे आम्ही बाटु सगळी ।। चिंता न करावी मानसीं ।।४५।। मग दोन्ही हाताने तिकिटे दिलीं ।। हाता येईल जी का त्याते दिधली ।। यापरी वाटतां तिकिटे संपली ।। दादा निश्चिंत पहाती ।।४६।। कोणाचाही पैसा म्हणुनी ।। घेतला नाही तो महाराजानी ।। दादास म्हणती पेटी ही ठेवावी नेऊनी ।। कुलूप ते पक्के लावाही ।।४७।। महाराज पुढे जाऊनी बैसता ।। सिंह वाघाशी म्हणती काढा आता ।। दादा म्हणती त्या मोकळें करीता ।। इजा करतील व्यर्थची ।।४८।। महाराज म्हणती नाई नाई ।। मोकळे सोंडावे ते सर्वही ।। मग एक एक काढीता ।। गुढगे टेकुनी पाही ।। महाराजाकडे ते पहाती ।।४९।। दत्त म्हणताची सिंह व्यघ्रादी गेले ।। आपापल्या पिंजऱ्यामाजी जाऊनी बैसले ।। समस्ता लागी ते नवल वाटले ।। धन्यवाद देती ते महाराजां ।।५०।। महाराज म्हणती दादाला ।। काही खजाना मोजून पाहीला ।। हसु आले दादाचे मनाला ।। पैसाहि घेतला नसे म्हणोनी ।।५१।। परी आज्ञा ती प्रमाण मानुनी ।। पेटी ती आणविली बाहेर काढूनी ।। कुलुप काढीता द्रव्य ते नयनी ।। पेटी भरोनीया देखीले ।।५२।। मग दादा तात्काळ पुढे येऊनी ।। मस्तक ठेविले ते महाराज चरणी ।। धन्य म्हणे सद्गुरू महिमा न कळे मनी ।। म्हणोनीया चरणी लागले ।।५३।। दादाचा निरोप घेऊनी सत्वर ।। महाराज

आले ते मठावर ।। दादा ते दर्शना येती वारंवार ।। श्रद्धाती महाराजावरी जडलीसे ।।५४।। हुकुमाविण मंदिर बांधिले म्हणोनी ।। मठाविरूद्ध आले ते लोहुनी ।। की मंदीर पाडावे ते मुळापासुनी ।। हुकुम सरकारी तो जहालासे ।।५५।। याच छत्र्यानो हैद्राबादेस जाऊन ।। योग्य ती कारवाई अंगेची करून ।। पाडावयाचा हुकुम तो रद्द होताची जाण ।। महाराजा येऊनी सांगती ।।५६।। पुढे भिक्षा निमित्त करूनी महाराजाला ।। माईसह नेंले मग मुम्बईला ।। आदरातिथ्य करूनी त्या सद्‌गुरूला ।। ठेऊनी घेतले आदरें ।।५७।। परी महाराज सत्वरचि तेथुनी ।। मठा आले परतोनी ।। दादासह मग ते येथेची राहोनी ।। नित्य सोहळा करीताती ।।५८।। संत ते करीतो सदा अघटित धुलीचंद काका म्हणती महाराजाप्रत ।। दाळ बट्टीचा करू तो आजी बेत ।। गोष्टही समस्तां मानली ।।५९।। धुलीचंद असे हा मारवाडी ब्राम्हण ।। महाराजावरी असे ती श्रद्धापूर्ण ।। दादा माईची ती सम्मती घेऊन ।। पाक तयार करविला ।।६०।। तुपाचा डबा तो वेळीच आणिला ।। काका अंगेची फोडीती होऊनी त्याला ।। सर्वचि बैसले असती त्या पंक्तीला ।। महाराजा सहित सर्वचि ।।६१।। डब्यामाजीं उन्दीर पाहुनी ।। धुलीचंद गेला तो घाबरोनी ।। हळुच मग त्या शेपटा धरूनी ।। फेकीला दुर तो काढुनी ।।६२।। काका ते म्हणती आपुले मनीं ।। कैसी करावी ती आता करणी ।। ऐन वेळी ते तूप कोठूनी ।। आणावे म्हणती मानसीं ।।६३।। तोची महाराज काकाकडे आले ।। म्हणती काही तुम्ही ते काय फेकिले ।। महाराज ते तात्काळ तीकडे गेले ।। रताळु एक आणिले तेथुनीं ।।६४।।

म्हणती रताळु हे उत्तम असून ।। काही दिले काका ते फेकून ।। मग ते महाराजाने अंगेचि मोडून ।। प्रसाद दिधला समस्तां ।।६५।। तुपाशी पहाती काका येऊन ।। उत्तम जहाले ते सुवासीक पूर्ण ।। घान गेली ती सर्वचि निघून ।। भोजना मग बैसती सर्वचि ।। ६६।। भोजन ते यथासांग जहाले ।। महाराज माईशी बोलु लागले ।। काकांनी तुप किती उत्तम आणिले ।। नाई काव माई विचारीती ।।६७।। या परी ऐकता महाराज वचन ।। भरून आले काकाचे ते अंत:करण ।। महाराजांचे येऊनीं धरिती चरण ।। आनंदाश्रु नयनी वाहती ।।६८।। गुरूचं नांव मोठ म्हणती काहो दादा? ।। मुखाने घ्यावे ते सदा सर्वदा ।। पण विसरू नाई ही तयासीकदा ।। कावं माई आसचं ना? ।।६९।। बोलो आनंदी माई की जय ।। कृष्ण मोठा पण गुरू केला सांदिपनी ।। रामाशी तो जहाला वसिष्ट मुनी ।। माई, नामदेवाचा उद्धार केला कोणी ।। त्या विसोबा खेचराणी नाही का? ।।७०।। बोलो आनंदी माई की जय, असो नित्य महाराजा जवळी ।। कुत्री असे ती नामे काली ।। प्रत्यक्ष वाघीणची ती वेळी अवेळी ।। साथ देत महाराजां ।।७१।। एकदा ती व्याली असतां जाण ।। महाराज निघाले ते तिला सोडून ।। तोचि तात्काळ तो पुढे येऊन ।। तांग्या माजी बैसली ।।७२।। महाराजांनी तिशी कुरवाळीले ।। म्हणती आलीस कागे सोडुनी पिले ।। माई कीती ग इचे हे ज्ञान आगळे ।। आलेत मग माघारी मठी त्यां ।।७३।। कोणी आलीया महाराजां जवळी ।। वाघीन जैसी का त्यावरी धावे कालीं ।। परी कोणाही कधी ती नसे चावली ।। असो ती यापरी सद्‌गुणी ।।७४।। असो सदानंद महाराजाचे ते शिष्य बहुत ।। माई ती म्हणें महाराजाप्रत ।।

महाराज चला जाऊ देवाच्या राज्यांत ।। भिक्षा करू कांही तेथेची ।।७५।। महाराज म्हणती देवा याव काही आम्ही ।। पण माई म्हणते बरोबर असावं तुम्ही ।। देव म्हणती टाकरवनाशी ते तुम्हा आम्हीं ।। मिळोनी जाऊ आत्ताची ।।७६।। दमणीं ती सांगते घेऊन ।। टाकरवनी आले ते तिघजन ।। माई महाराज देव मिळोन ।। पारादरी बैसती घेऊनी ।।७७।। पहाती तो कोणी न भेंटे कोंणाला ।। सर्वचि गेले ते बाजाराला ।। देवाशी तो मोठा राग आला ।। यष्टीका करीती घेतली ।।७८।। मार्गावरी जो कोणी दिसला ।। दगड मारीती देव त्याला ।। आल्या गेल्यावरी ते येती रागाला ।। धावपळ जहाली एकची ।।७९।। लोक भराभर माघारी आले ।। कळेनाही ज्यां ते तेथेचि राहीले ।। महाराज म्हणती आम्ही आहोत भुकेले ।। देवा भाकरी मागवाना ।।८०।। देव म्हणती भाकरी बिकरी नाही ।। माई म्हणें देवा कसहो तुमचं हे समजनं काही ।। देव म्हणती सटवे तुच आहेस पांढर पायीं ।। आता उगीच बैसेका ।।८१।। तोची लोक सर्व जमा जहाले ।। भाकरीचे भरभरून येती टोपले ।। दुध दही भाज्या त्या आणती सगळे ।। मग काला तो एकची जहाला ।।८२।। भोजनाची होती ती बरोबरी ।। मग जमली मंडळी पारावरी ।। देव सांगतील ती भीक्षा सत्वरी ।। पारावरी देती आणुनीया ।।८३।। ज्वारी कडब्याच्या त्या गाड्या भरल्या ।। मठाकडे त्या जाऊ लागल्या ।। महाराज म्हणती गाड्यां आतां मठीं पोहचल्या ।। चला आपण येथुनी ।।८४।। मग दमनीं माजी तीघे बैसले ।। माई ती महाराजालागी बोले ।। किती ही भीक्षा मी तर पाहुनी थक्क जहाले ।। काही देवा बोलेना ।।८५।। देव न बोलती ते काहा बोला ।। ठोसा

एक माईने पाहून दिला ।। देव उतरून लागले पळायला ।। जातो म्हणे मी आमीनाकडे ।।८६।। पोलीस आणि तो आता मी त्वरीत ।। बेडी घालवितो इचे पायांत ।। सटवी रांड म्हणुनी पळत ।। गेले ते दुरवर तेथुनी ।।८७।। महाराज म्हणती माई, अग बोलाव त्याला ।। माई म्हणें जाऊद्या त्या मेल्याला ।। मग महाराजची या या म्हणतीं देवाला ।। देव लुटुलुटु आले पळतची ।।८८।। येऊनी माईचे गळा पडले ।। मग तिघेहि हासु लागले ।। या परी खेळी मेळीन मठां आले ।। आनंद सर्वत्रची जहाला ।।८९।। असो बाळाभाऊ मेहेकरकर ।। महाराजाचे शिष्य असती थोर ।। एकदां उत्सवा निमित्त ब्राह्मणा सत्वर ।। निमंत्रण द्यावया गेलेसे ।।९०।। ब्रह्मते सर्वचि बोलती ।। आम्ही तुमचे घरी न येऊ म्हणती ।। बाटक्या गुरूचा उपदेश तो तुम्हाप्रती ।। म्हणोनी वाळीत तुम्हा ते टाकीले ।।९१।। बाळाभाऊ हे होऊनी चिंतक्रांत ।। गुरूमाऊलींचा आठव तो करीतो मनांत ।। मग माडीवर जाऊनी बैसले त्वरीत ।। अन्न पाण्याविण तैसेचि ।।९२।। मग एकाच पायावरी उभे राहून ।। अंतरी चालिले गुरूचिंतन ।। एक्या हाती तो दोर धरून ।। कवाडे ती लाविली सर्वचि ।।९३।। म्हणती गुरूमाऊली ती आल्याविण ।। न येऊ म्हणती खालती उतरून ।। निश्चय ऐसा तो मनी करून ।। एका पायावरी उभे ते तैसेचि ।।९४।। दीड दिवस तो यापरी गेला निघोन ।। समजावितो अवघे ब्राह्मण येऊन ।। आम्ही येऊ म्हणती आपण होऊन ।। द्वार ते उघडा हो लवकरी ।।९५।। परी बाळाभाऊचा निर्धार देखून ।। चिंताक्रांत जहाले अवघे जण ।। महाराजालागी ते आणावया म्हणून ।। मनुष्य तो पाठवावे म्हणताती ।।९६।। महाराजाचा नसे तो ठाव ठिकाण

।। कोठे म्हणोन पाठवावा मनुष्य कोण ।। तोची एका दुकानीं महाराज आले म्हणून ।। वार्ता येऊनी पोहचली ।।९७।। सकळाशी विस्मय वाटला मनी ।। तो महाराजचि आले त्या स्थानी ।। जो तो येतसे दर्शना लागुनी ।। एकचि गर्दी जहाली ।।९८।। तडक महाराज वरती जाती ।। बाळा भाऊ ते हाका मारिती ।। उशीर जहाला हो मज यावया प्रति ।। उघडी द्वार आता ।।९९।। बाळाभाऊने द्वार उघडिले ।। येऊनी तात्काळ चरणी लागले ।। ब्राह्मण ते सर्वचि गोळा जहाले ।। नमस्कार करीती ती महाराजां ।।१००।। महाराज म्हणती आम्ही बाटके जरी ।। परी बाळाभाऊ असे हो सदाचारी ।। खुणेचे बोल ते ऐकता यापरी ।। क्षमा ती मागती ब्राह्मण ।।१०१।। तुम्ही भूदेव शब्द तुमचा आम्हां प्रमाण ।। उत्सव तो थाटानें वरावा येऊन ।। बाळा भाऊस त्रास न द्यावा येथून ।। बोलुनीया तैसेचि निघती ।।१०२।। सर्वचि म्हणतीं महाराजाला ।। तुम्ही रहावे या उत्सवाला ।। महाराज म्हणती आम्ही जाऊ आता बीबीला ।। आमंत्रण त्या काजीचे घेतले हो ।।१०३।। किती एक महाराजासवे निघती ।। काजी साहेब यवन ते वाट पहाती ।। तोची महाराज येऊनी पोहचती ।। सलामादि जहाले सहजची ।।१०४।। काजी पुढे होऊनी बोलती ।। खाना तो तयार आहे म्हणती ।। हम तो तयार है, महाराज म्हणती ।। परी फराळाचे कांही आणा या ब्राह्मणा ।।१०५।। बिऱ्यानी महाराजा मुद्दाम करविली ।। काजी म्हणे गोष्ट ही बरी नाही केली ।। इकडे फराळाची व्यवस्था ती लाविली ।। दूध खजूर देऊनीं समस्तां ।।१०६।। काही दुध घेऊनी हातात ।। शिंचन करीती पाक गृहांत ।। तो किती एक म्हणती महाराजाप्रत ।। तुम्हा सवेचि जेऊ

आम्हीही ।।१०७।। सर्वचि बैसले एक्या स्थळी ।। बिऱ्याणी वरचे ती झाकणें काढीली ।। आंत पहातो तो बासुन्दी सगळी ।। अन्य तो पदार्थ नसेचि ।।१०८।। रंगनाथ महाराज की जय म्हणून ।। गजर करीतीं अवघे जन ।। विस्मय तो वाटला यवना लागून ।। क्षमा ती मागती महाराजा ।।१०९।। काजीचा तो निरोप घेऊन ।। महाराज पोहचती मठी येऊन ।। तो भंग्याने दिधली भांग करून ।। महाराजाशी ती तात्काळ ।।११०।। कैलास टेकडीवरी एकदां जातां ।। नित्यापरी ते सांगती त्यां काशीनाथा ।। भाजी भाकरी तूं वरी आणि आता ।। आम्ही तो पूढे चालीलो ।।१११।। वाडीचा हा काशीनाथ सोनार ।। नित्यापरी घेऊनी गेला तो भाजी भाकर ।। वरा पहाताची समुदाय फार ।। खीन्न जहाला तो मानसी ।।११२।। भाकऱ्या त्या दहा बारा असती ।। द्यावे म्हणे तो कोणास किती ।। महाराज सोनाराशीं त्या म्हणती ।। टोपली ती इकडे आण पाहु ।।११३।। महाराज म्हणती ते माईला ।। भाकरीवरी भाजी घालुनी दे सर्वाला ।। पोटभर जेऊ घाल बरं प्रत्येकाला ।। मागे पुढे पाहु नको ।।११४।। टोपलीवरी झांकण ठेऊन ।। एक एक भाकरी देती महाराज काढून ।। समस्ताची ती भोजने होऊन ।। चार भाकरी त्या राहील्या तैशाची ।।११५।। सोनार तो चकितची जहाला ।। किती असे ही म्हणें अघटीत लीला ।। महाराज ते म्हनती माईला ।। अवघा गुरूच गुरू नाई माई ।।११६।। बोलो आनंदी माई की जय ।। एकदां महाराज शिवण्यास आले ।। ते दादासाहेबानी जेव्हा ऐकीले ।। सोवळ्यातची तैसे ते निघाले ।। येऊनी महाराजा भेटती ।।११७।। महाराज म्हणती आबा मोठे अधिकारी होते बुवा ।। तुम्ही ही

पुजा सोडून आले पहा ।। आम्ही तर म्हणतो गुरूचं नांव घेत रहा ।। नाही काग माई ।। बोलो आनंदी माई की जय ।।११८।। दादास तो गहीवर दाटला ।। गृही आणीती महाराजाला ।। आबाचे सिंहासन होते बैठकीला ।। त्यावरी महाराजा बैसविती ।।११९।। महाराज म्हणती नाई नाई ।। त्यां गादीस आम्ही पाय लावणार नाही ।। दादा म्हणती ते राहु द्या आता सर्वही ।। बळेच बैसविले महाराजा ।।१२०।। तो दादास ढसढसा रडु कोसळले ।। प्रत्यक्ष आबासाहेबची त्यांना दिसले ।। मग महाराजांच्या त्यां चरणीं लागले ।। शब्द न बोलवेचि किंचित ।।१२१।। मग दादाचा निरोप घेऊन ।। महाराज निघती तात्काळ तेथून ।। पुढील अध्यायी मठादिकाचे वर्णन येईल तेचि परियेसा ।।१२२।। वदता वदविता तो रूक्मिणी पती ।। इतरा नेनवे ती संत महतीं ।। तेथे वासुदेवाची मती किती ।। कायसी समर्थ बोलया ।।१२३।। इति श्री आत्मानंद चरित्र कथासार ।। सष्टमोध्याय: ।। श्री कृष्णार्पणमस्तु ।। हरयेनम: । हरयेनम: ।।६।।

श्री गणेशायनम: ।। श्री सरस्वत्यैनम: ।। श्री गोपालकृष्णायनम: ।। जयजयाजी कमळापतो ।। असुरांतका विश्वमूर्ती ।। आदिअंती तुच एक जगत्पत्ती ।। लीला करीतोसी साक्षिते ।।१।। तूं आसमी भक्ताधिन ।। भक्त असति ते तुज अभिन्न ।। सगुणरूपा तू रूक्मिणीरमण ।। पुढे चरित्र बोलवी ।।२।। सातवा अध्याय अति सुरस ।। आत्मानंद चरित्राचा हा कळस ।। अज्ञानी जन ते उद्धारायास ।। अवतार असे हा दत्ताचा ।।३।। असो महाराजांनी मठ किती स्थापिले ।। ते वर्णीता नयेचि सगळें ।। त्यामाजी काही ते निवडून आगळे ।। संकेत तेव्हढाची पहावा ।।४।। पीरवाडी

शिवना टाका देऊळगांव पठाणी ।। राहेरीं वाघ्रळ शेलगांव आणि टेंभुर्णी ।। गणपती महादेवाच्या त्या मुर्ती या ठिकाणी ।। स्थापन केल्याचे आदरे ।।५।। कोठे देवी आणि दत्ताच्या मुर्ती स्थापिल्या ।। कोठे त्या गुरूपादुकाची स्थापुनी ठेविल्या ।। सर्वचि ते वर्णन येथे केलीया ।। विस्तार होईल ग्रंथाचा ।।६।। शेवटी विश्रांती मठ स्थापून ।। आनंदवाडीचाही मठ तो जवळी तेथुन ।। परी विश्रांती मठ हा प्रसिद्ध पूर्ण ।। शेवटी तो येथेचि जहालासे ।।७।। असो एक तो तया शंकराचार्य कुंभेफळा येऊनी ।। हाताशी काही ते दलाल घेऊनी ।। फसवितसे ती लोका नाडुनी ।। महाराजा विदित जहाले हे ।।८।। बाळाभाऊ ही समागमें असती ।। लाडगांवची वेश्या ती घेतली सांगाती ।। तीच्या गळां तो हात प्रीतीं ।। घालुनी भेटीस आले त्यां ।।९।। दृष्टादृष्ट होताची सगळे ।। आचार्यासह ते सर्वचि उठले ।। उच्चासनी मग महाराजा बसविले ।। आचार्य ते बोलती महाराजा ।।१०।। आम्हींच येणार होतो तुमचे मठीं ।। पण तुम्हीच दिली ती येऊनी येथे भेटी ।। आता मी तू पण गेले उठाउठी ।। केवळ तुमच्या या दर्शनें ।।११।। महाराज म्हणती मार्ग आमुचा खडतर ।। काट्या बोराट्या असती येथे फार ।। आम्ही अहोत असे हे फकीर ।। आम्हास कांही ते बाधोना ।।१२।। तोची मार्ग आम्हाशी सापडेना ।। आचार्य म्हणती महाराजानां ।। महाराज म्हणती गुरूदृष्टीविण तो कोणा ।। मार्ग ना सापडेची सर्वथा ।।१३।। आम्ही पहा असे वेडे बावळे ।। लग्नही आमुचे नाही बुवा झाले ।। बायकु नाही म्हणुनीया आवाशी ठेविले ।। गुरूचं नांव मात्र घेतो बुवा ।।१४।। जरीची शाल ती उत्तम आणून ।। महाराजा पांघरती आचार्य उठून ।। महाराज

म्हणती नाई नाई बाळाभऊस टाका तो देऊन ।। ते आधीकारी आहेत मोठे बुवा ।। मग बाळाभाऊसही तैशीच शाल आणून ।। आचार्य देतीं तात्काळ उठून ।। निरोप घेता ते आपण होऊन ।। म्हणती उदयीक कळेल ते सर्वचि ।।१६।। उदयीक काय घडणार ते कळेना ।। परस्पर बोलता करीती कल्पना ।। तोची धरणे आले ते आचार्याना ।। सरकारातून तेथेचि ।।१७।। लाडगांवी ते महाराज येती ।। पाटलास तुमची ती आवाँ घ्या म्हणती ।। बोलून यापरी ते मठात येती ।। आनंदी आनंद सर्वचि ।।१८।। बोलो आनंदी माई की जय, आता सांगेन उपदेशाची रींती ।। महाराज मंत्र देतो कवण्या पद्धती ।। स्वच्छंदी महाराज सदा वर्तती ।। काळ वेळ त्या बंधन असेना ।।१९।। मात्र निश्चय पाहिजे मनातुनी ।। मग महाराज ते येते आपण होऊनी ।। एकदां यज्ञेश्वर पाठक टेंभूर्णी यानी ।। निश्चय तो मानसी केलासे ।।२०।। निजकांतेशी सांगती एकांती खूण ।। तूं आहेस गे उपदेशाविण ।। तरी मंत्र तो घ्यावा महाराजा कडोन ।। कधी ते आलीया येथेची ।।२१।। त्यास लोटलासे काहीं काळ ।। बाईस ही विसर तो पडला सकळ ।। तो एके दिवशी महाराज तात्काळ ।। गृहीं त्यां येती बाईच्या ।।२२।। सीता सीता म्हणुनी हाक मारीती ।। उपदेश पाहिजे होता ना तुज प्रती ।। सांगून गेला ना तूझा तो पती ।। मग आज घेईका उपदेशा ।।२३।। बाईशी तो आठव जहाला ।। धन्य धन्य म्हणोनी महाराजालां ।। त्यांच दिनी तो उपदेश घेतला ।। समाधान पावला अंतरी ।।२४।। पुढे बाळकृष्ण पाठक तो बाईचाची सुत ।। गुरूमंत्र घ्यावा तो इच्छि मनांत ।। परी योगचि नये तो यत्ने करीता सतत ।। काही केल्याची सर्वथा

।।२५।। महाराज आले जेथे ।। बाळकृष्णही जाय तेथे तेथे ।। वेध असा तो सारीखा मनाते ।। एकसरेचि लागला ।।२६।। एकदा महाराज दुकानी बैसून ।। तांबुलाचे ते करीती सेवन ।। तांबुळ सेविता काही तो बाहेर येऊन ।। पडु पाहेचि निश्चये ।।२७।। एसे बाळकृष्ण दृष्टि पहाता ।। म्हणे एवढा जरी प्रसाद आला हाता ।। तोची महाराज सावरोनी तांबुळ मुखी घालिता ।। अवकाश आहे रे म्हणती आजुना त्यां ।।२८।। पुढे सहज एकदां अकोल्या भितरी ।। काही निमित्त होते त्या कुळकर्ण्याचे घरी ।। महाराजही येऊनी बैसले पारावरी ।। बाळकृष्णही होता तेथेचि ।।२९।। मग महाराजा भोजना पाचारीती ।। पार सोडून ते न येऊ आम्ही म्हणती ।। मग तेथेची आणूनी नैवेद्य समर्पिती ।। भोजन ते करविती प्रीतीनें ।।३०।। इकडे बाळकृष्णा वाटे जावे येथून ।। यावे महाराजाचे ते दर्शन घेऊन ।। परी खोळंबा तो होऊ नये म्हणोन ।। भोजनालागी बैसती ।।३१।। तीकडे भोजन घेऊन जे जे का गेले ते ते उपदेश घेऊनी माघारा आले ।। ऐसे ऐंकताची ते रडु कोसळले ।। बाळकृष्णाशी त्या सहजचि ।।३२।। म्हणें व्यर्थ घालविली आजची वेळ ।। थांबलो येथे मी भोजना केवळ ।। तोची बाळकृष्णाशी पहाता ते तात्काळ ।। महाराज ते हाका मारीती ।।३३।। बाळकृष्णाशी ते येता समोर ।। म्हणें तुज उपदेश पाहिजे होता ना आजवर ।। मग घे का आता येथेची पारावर ।। जवळी तूं इकडे येईका ।।३४।। संशयीत पाहुनी बाळकृष्णाचे मन ।। महाराज म्हणती गायत्री मंत्र घेती आधी खाऊन ।। बाळकृष्णाशी त्यां पटली खूण ।। मंत्र घेतला तो तेथेचि ।।३५।। टेंभुर्णी येथील ग्राम जोशी ।। नामे बाळंभट म्हणती त्याशी ।। भगीनी सुता

होती ती त्याज पाशी ।। मामाशी म्हणें ती सहजची ।।३६।। महाराजाचा गुरूमंत्र सर्वचि घेतीं ।। आपणही म्हणावे महाराजाप्रती ।। मामा म्हणें जाऊ दे ऐसे भोंदु आहेत कीती ।। नादी न लागावे तयाच्या ।।३७।। बाईनें विषयची तो सोडीला ।। निघाली मग ती नहावयाला ।। कुड्याचा जोड तो ठेवावयाला ।। मामा जवळी त्यां दिधला ।।३८।। दुसरीये दिनी बाई मामाला ।। कुड्या द्याहो म्हणें ती माझ्या मला ।। धुंडीताहि न सापडती भटजीला ।। आठ तो मानसी नयेची ।।३९।। मग सहज आली कल्पना ।। आपण उगिच बोलीलो महाराजाना ।। चला जाऊ म्हणे तेथेची दर्शना ।। क्षमाती मागु तयाची ।।४०।। दत्तापाशी येता भटजी दुरून ।। महाराजानें केले ते अवलोकन ।। या या भटजी आम्ही भोंदु मग काय म्हणोन ।। आलात कैसे ते कळोद्या ।।४१।। बाळंभट गेले ते बावरून ।। आपुले बोलाची ती पटली खूण ।। मग तैसेचि ते लोटांगण ।। महाराज चरणी घातीले ।।४२।। भटजीस हाता धरोनी उठविती ।। समाधान तयाचे ते करिती ।। कुड्या तुमच्या त्या मडक्यामाजी असती ।। विसरतो तुम्हांशी पडलासे ।।४३।। मग मामा भाची या दोघानी ।। मंत्र घेतला महाराजा पासोनी ।। महाराज ते आधिकारी आणि अंतरज्ञानी ।। कळले ते आता समस्ता ।।४४।। ऐसीच पार्वतीबाई नामे करून ।। बाई एक असे ही भाविक पुर्ण ।। चिखली समीपची एक ग्राम लहान ।। वास्तव्य ते बाईचे तेथेचि ।।४५।। महाराजाची ऐकुनी किर्ती ।। निश्चय केला तो आपुले चित्ती ।। की उपदेश घ्यावा तो सत्वर गती ।। महाराज आलिया यथेचि ।।४६।। मग पार्वतीबाई चिखलीस जाऊन ।। सावजीस सांगे वर्तमान ।। म्हणें महाराज येताची मज बोलाऊन

।। घ्यावे तात्काळ येथेचि ।।४७।। या परी सावजीस सांगून ।। निज गृहाती आली परतोन ।। दुसरें दिनी धुवाया म्हणून ।। नदीवरी गेलीसे ।।४८।। तोचि अवचित महाराज येती नदिला ।। हाका मारोनी म्हणती त्या पार्वतीला ।। गुरू मंत्र पाहिजे होता ना तुला ।। मग घेईका आता येऊनी ।।४९।। बाई गेली भांबाऊन ।। शब्द न निघे तो मुखातून ।। न पुसताची मग कोठील कोण ।। गुरूमंत्र घेतला तेथेची ।।५०।। बाईस म्हणती महाराज सत्वरी ।। भाजी भाकरी जीका केली तूं घरी ।। प्रसाद तो घेऊनी ये तू नदीवरी ।। खाऊ येथेचि बैसूनी ।।५१।। बाई तात्काळ घरी जाऊन ।। आला ती भाजी भाकरी घेऊन ।। मग महाराज करीती प्रीती भोजन ।। नीघोनीया जाती तेथुनी ।।५२।। मग मागाऊन जनसमुदाय आला ।। बाईला त्या पुसु लागला ।। इकडे महाराज आले का सांग आम्हाला ।। ऐकुनी बाई विस्मित ।।५३।। कैसे महाराज कोठील कोण ।। सांगावी तुम्ही तो काही खूण ।। समुदाय म्हणें ते रंगनाथ महाराज म्हणून ।। प्रसीद्ध असती न्हाव्याचे ।।५४।। शब्द रंगनाथ महाराज एवढे ऐकीले बाई तें ढसाढसा रडु कोसळले।। म्हणें मी अभागीं कैसे विचित्र जहाले।। भाजी भाकरचि महाराजा घातिली ।।५५।। कितीएक दिवसापासोनी मनी ।। इच्छा होती ती पूर्ण केली येथे येऊनी ।। महाराज असती हे अंतरज्ञानी ।। अनुभव तो आजी आलासे ।।५६।। ऐसे कीतीतरी दृष्टांत असती ।। ते सांगावे येथे केशा रीती ।। मतीतार्थ तो इतुकाची जाणावा श्रोती ।। तळमळ ती मानसी असावी ।।५७।। जो जैशा रीती ये शरण ।। महाराज तैशेची करीती त्या मार्गदर्शन ।। पतीताचा उद्धार तो व्हावा म्हणून ।। संचार सर्वत्र असे हा ।।५८।। एकादा चांडोळचे

सावजी आदी करून महाराजासह निघती चांडोळाहून ।। मार्गी चालता जाफराबादी येऊन ।। चिंचेखाली बैसले ।।५९।। गावाबाहेरचि असे हे स्थान ।। चिंचा कौटीचे असे ते वन ।। गर्द छाया ती उत्तम पाहुन ।। महाराज तेथेचि बैसति ।।६०।। सर्वचि म्हणती महाराजाला ।। चला जाऊ आता टेंभुर्णीला ।। तोची जनसमुदाय तेथे आला ।। दर्शना निमित्त सर्वचि ।।६१।। महाराज म्हणती सावजीला ।। चंद्राबाई होती याच वस्तीला ।। माईचा तिने प्रतिपाळ केला ।। नाई कावं माई सांगन तू ।।६२।। बोलो आनंदी माई की जय ।। तोची गावीचे काही प्रतिष्ठींत ।। मिळोनी येती दर्शना निमित्त ।। त्यामाजी नामे गबाजी भगवंत ।। देशपांडे असती येथीचे ।।६३।। जेष्ट पुत्र स्नुषा ती घेऊनी समवेत ।। येऊनी दर्शन घेती त्वरीत ।। जानकीरामपंत नामे हा जेष्ट सुत ।। पत्नीसह समोरा ठाकला ।।६४।। सीताबाई साध्वी प्रतीव्रता ।। सुशील लाघलासे पंताशी कांता ।। उभयतां महाराजाचे चरणी लागतां ।। महाराज बोलती आबाशी ।।६५।। आबा, ह्याच दांपत्यापासून ।। कुल प्रकाशित होईल ते पूर्ण ।। ऐसे देऊनीया आशिवर्चन ।। कृपा हस्त तो ठेविला ।।६६।। असत्य नोहे ते संत वचन ।। पुढे पत्र पौत्रादी जहाले ते विद्यासंपन्न ।। किती एक पाश्चात्य शिक्षणाचे पदवीधर होऊन ।। संसारी सुखे नांदती ।।६७।। देशपांडे घराणें हे विख्यात ।। आबा साहेबचीं म्हणती ज्यां समस्त ।। तैसे रावजी यशवंत हे संतभक्त ।। नायब असती येथीचे ।।६८।। सीताराम माणीक चिमणाजीपंत ।। तैसेचि केशव गोविंद आणि कोन्डोपंत मुळे मंडळीही जाती समस्त ।। दर्शना निमित्त सर्वचि ।।६९।। सर्वचि महाराजा जवळी येऊन ।। घेती महाराजाचे

ते दर्शन ।। महाराज म्हणती आम्ही थांबलो बुवा येऊन ।। विश्रांतीलागी येथेचि ।।७०।। महाराजा प्रार्थीती सकळ मिळोन ।। आता भोजनोत्तरची जावे म्हणती येथून ।। होकार मिळताचि मग अन्नाचे ताटे भरभरून ।। घेऊन येती सर्वचि ।।७१।। रावजी पंतही सुग्रास भोजन घेऊन ।। निघता पत्नी बोले ती पती लागून ।। म्हणें मघाशीच वांग्याची भाजी करून ।। ठेवीली ती न्याहो महाराजां ।।७२।। गीताबाईची ती श्रद्धा पूर्ण ।। आधिच ठेविली वांग्याचीं भाजी करून ।। परी पंत म्हणती दुपारची ती नको म्हणून ।। महाराजा जवळी आलेसे ।।७३।। ताट पुढे ठेविताची जाण ।। महाराज पहाती त्या उघडून ।। म्हणे काही भाजी आणली नाहीं दुपारची म्हणून ।। आम्हां कारणें जी केलीसे ।।७४।। खुणेचा शब्द तो येताची कानीं ।। गहीवर आला तो पंता दाटुनी ।। मग तैसेचि मागुता घरी जाऊनी ।। भाजी ती घेऊन आलेसे ।।७५।। असो कृष्णदेव लेखकाचे पितामह ।। महाराजाशी असे तो अति स्नेह ।। उभयता माया ममता टाकोनी मोह ।। ब्रह्म भावेचि बोलती ।।७६।। देव येताची माजी भाकरी घेऊन ।। महाराज अंगेची घेती हातातून ।। म्हणती किती चतुर आहे पहा ही तुमची सून ।। तात्काळ भाजी भाकरी केलीसें ।।७७।। सुन्दराबाई ही प्रत्यक्ष लेखकाची आई ।। पहाताच महाराज म्हणती ये माई ।। कितीग केलीस भाजी भाकरीची घाई ।। घेऊनी आलीस महाराजा ।।७८।। मग अवघाची तो काला करून ।। महाराज मिटक्या मारूनी करीती भोजन ।। आबासाहेबाशी म्हणती आबा तुम्हाशी पूर्ण ।। आधीकार आचार्याचे आहेत बुवा ।।७९।। काही आबा तुम्ही शक्तिचे उपासक ।। आमूचे देव

असती संस्थानिक ।। तैसेचि रावजी पंत हे वैष्णव एक ।। त्रिगुण संगम हा जहाला बुवा ।।८०।। आम्ही तर बुवा असाच काला करीतो ।। कोठेही बसून खातो पितो ।। आम्हा ठाऊक नाही स्नान संध्यादि धर्म तो ।। गुरूच नांव तेवढं घेतो पहा ।।८१।। (बोलो सहजानंद महाराज की जय) यापरी दिनोद करीता भोजन सारून ।। टेंभुर्णीस आले ते तात्काळ निघोन ।। महाराज येताची ते सकळ जन ।। दर्शना निमित्त पातले ।।८२।। सर्वचि येऊनी दर्शन घेती ।। त्या माजी किती एक शिष्य असती ।। महाराज संकेतेचि तयाशी बोलती ।। नित्यापरी ते सहजचि ।।८३।। म्हणती गुरूचं नांव सदा घ्यावं ।। गुरू ते सर्वदा भजावं ।। गुरू सांगतील ते करावं ।। गुरू करतील ते करू नये ।।८४।। करावा सर्वदा हाचि यत्न ।। व्हावे ते गुरूचे समान ।। तरीच सार्थक गुरूं करून ।। कावं माई गुरूच सर्व नाई कां? ।।८५।। (बोलो आनंदी माई की जय) आता ऐका ते सावधान ।। सदानंद महाराज झेंडानंद यासी घेऊन ।। मुक्काम केला पीरवाडी येथे येऊन ।। प्रात:काळी उठती उभयतां ।।८६।। देव म्हणती वाढली ती पोटाची व्यथा नयनी पाहु त्यां सद्गुरूनाथा ।। पुंडलीका सांगती गाडी जोत आता ।। आनंदवाडीस जाऊ म्हणताती ।।८७।। मार्गी विश्रांतीमठा त्या उतरून ।। श्री दत्ताचे घेतले जाऊनी दर्शन ।। मग पूर्वाभिमुखते तेथेचि बैसून ।। ध्यानी निमग्न जहालेसे ।।८८।। त्यापरी करीता गुरूं चिंतन प्रारब्ध दशाति जहाली पूर्ण ।। प्रारब्ध संपताची प्राण ज्योती विलीन ।। दत्तस्वरूपी ती जहालीसे ।।८९।। देवा देवा म्हणुनी हाका मारीती ।। परी आता कैची ती नामरूपया ती ।। हाहा:कार होऊनी समुदाय अति ।।

मठावरी जमलासे ।।९०।। म्हणती कोणी तरी आनंदवाडीस जाऊनी आता ।। कळवावी महाराजा ही दु:खद वार्ता ।। गडी तो जाऊनी महाराजा सांगता ।। अकांत एकचि जहाला ।।९१।। ढसढसा माईस रडु कोसळले ।। महाराज म्हणती देव नाही ग गेले ।। ते दत्तरूप होऊनी तेथेचि बैसले ।। माई तू आताचि जाईका ।।९२।। मग माईस पाठविले समाधीस्थान सांगून ।। टीळकादी आपण गेले ते मागाऊन ।। अफाट समुदाय तो संस्कारा देखून ।। महाराज नगारा वाजविती ।।९३।। (बोलो सदानंद महाराजकी जय) जिकडे तिकडे दिंड्या भजन ।। चोहीकडे एकचि ते नामस्मरण ।। सदानंद महाराजकी जय म्हणून ।। अपार वाद्ये वाजती ।।९४।। गुलाल उदबत्या कापूर ।। सुवासे कोंदले ते अंबर ।। पुजा आरती ती करूनी साचार ।। समाधी दिधली देवाते ।।९५।। तेरावे दिवशी समुदाय अति ।। जिकडे तिकडे पताका फडफडती ।। टाळ मृदंगाशी त्यां नाही मीती ।। अन्नदान अपार जहालेसे ।।९६।। महाराज सांगती समस्तांस ।। पुढे आता पौष वद्य एकादशीस ।। दिंड्या पालख्या पताका घेऊनी यात्रेस ।। प्रतीवर्षी येतसा ।।९७।। या रीती प्रतीवर्षी होतसे हा सोहळा ।। भजन पुजनादि प्रसाद काला ।। सर्वचि होतसे ही संतलीला ब्रह्मादिकाही कळना ।।९८।। असो पुढे आषाढ वद्य शष्टीसी ।। माईस बरें वाटेना त्या दिवशी ।। महाराज म्हणती माईशी ।। प्रारब्ध भोगून ही तू मोकळी ।।९९।। महाराज झोपडीचे बाहेर येती ।। प्रारब्धाची ही ऐशीच आहे गती ।। आम्ही काय करावं बुवा म्हणती ।। भोगुनी ती व्हावे मोकळे ।।१००।। महाराज पुनरपी आंत गेले ।। माईने चरणी मस्तक ठेविले ।। उठऊनी माईशी पुन्हा

पाहिले ।। तो माईती निजधामा येलीसे ।।१०१।। माई गेली म्हणून महाराज रडती ।। व्यवहार लोक ते करूनी बाविती ।। आता आम्हास जेऊ कोण घालील म्हणती ।। तो हाहा:कार सर्वचि जहाला ।।१०२।। मठीं समुदाय जमला अति ।। महाराज तयाते हासुनी म्हणती ।। जे जे येती ते ते सर्वचि जाती ।। जग रहाटी ती ऐशीच ।।१०३।। माईचा पूर्व इतिहास पहाता ।। आश्चर्य वाटेल ते लोका समस्तां ।। परी कीर्तीचा ध्वज तो लाऊनी आता ।। निजधामा गेली ती सहजची ।।१०४।। (बोलो आनंदी माई की जय) मग दत्त मंदीराच्या मागील भागात ।। समाधी दिधली त्या माईस ।। यथाविधी त्या संस्कारास ।। महाराज करीती स्वयेचि ।।१०५।। आषाढ वद्य शष्टिस ।। यात्रा ती येती मठास ।। सोहळा सर्वचि होतसे प्रती वर्षास ।। यथा विधी तो सर्वचि ।।१०६।। असो माई निजधामासी जाता ।। महाराजा आली उदासिनता ।। टीळक सावजीलागी ते म्हणतो आता ।। व्यवस्था पत्र ते करावे ।।१०७।। यथा पद्धती ते व्यवस्था पत्र करून ।। महाराज म्हणती चालवा पुढे ऐसेचि येथून ।। पंच ते सर्वचि शिष्यामाजी निवडून ।। घेतले व्यवस्था ती पहाया ।।१०८।। महाराज म्हणती सावजीला ।। आता सर्वच गोविंदा गोविंदा जहाला ।। बालासाहेबाचा तों लळीत काला ।। होऊनी लाटा पडताती ।।१०९।। बोलुनीया ऐशा त्या बोला ।। पुढील संकेताचि तो दाविला ।। म्हणती प्रारब्धाच्या त्यां गतीला ।। उपाय तो नसेची सर्वथा ।।११०।। महाराजाची प्रकृती खालावली ।। पाहुनी मंडळी ती उदास जहाली ।। महाराजही मग ते एकांत स्थळी ।। नित्य जाऊनीया बैसति ।।१११।। कार्तिक वद्य एकादशीला ।। महाराज सांगती ते

सर्वाला ।। कोणी इकडे येऊ नये ।। आम्हाला ।। पहावया ते चुकूनी ।।११२।। सर्वच मंडळी दत्तापाशी आले ।। सोन्या बापु आणि मैनाबाई तेथे राहिले ।। बाहेरूनीच लक्ष ठेविती सगळे ।। दु:खाश्रु ते लोटती समस्तां ।।११३।। कोणी बळेच समोर जाऊ पहाती ।। तो आतून हो बाहेर ऐसे त्यां म्हणती ।। मग प्रदोषकाळ येता ती त्रयोदशी तिथी ।। गोविंद ध्वनी तो ऐकीला ।।११४।। गोविंद ध्वनी तो ऐकुनी ।। महाराजा पहाती आंत जाऊनी ।। तो प्रत्यक्ष दत्तरूप दिसती नयनीं ।। स्वस्वरूपी ज्योत विरालीसे ।।११५।। ऐसे देखताची हाहा:कार ।। करूनी धबधबा बडविती उर ।। ऐसा संत म्हणती नाही होणार ।। म्हणोनीया आक्रोश करीताती ।।११६।। वायुवेगेही पसरली वार्ता ।। चोहिकडोंन समुदाय दिसे तो येता ।। जो तो रंगनाथ महाराजकीं जय म्हणता दिसे सर्वत्र एकचि ।।११७।। नादे भरून गेले अंबर ।। कापूर उदबत्याचा तो जहालासे धूर ।। पुष्पाचे ते घालीते आणुनी हार ।। महाराजावरी वर्वचि ।।११८।। एकचि गर्दी ती तेथे होऊनी ।। रानोमाळ दिसे तो समुदाय नयनीं ।। सकळाच्या त्या नेंत्रातुनी ।। आश्रु वहाती सारीखे ।।११९।। महाराजां त्या कुटी बाहेर आणिले ।। राजोपचारानें ते स्नान घातिले ।। गुलाल बुक्का तैसे ते पुष्पहार वाहिले ।। उत्तमासनी ते बैसविले आणुनी ।।१२०।। दिंड्या पताकाची ती रीघ लागली ।। नाना वाद्ये ती वाजती सगळी ।। मिरवणूक मिरवताचि मग दत्ता जवळी ।। सामोरा ठेविली आणोनीया ।।१२१।। मागुता पुजा आरति करून ।। सकळानी शेवटी घेतले दर्शन ।। मग समाधी स्थानी ते ठेविता नेऊन ।। जयजयकार एकचि जहाला ।।१२२।। न सांगताचि आली ती लवणाची पोती ।। समाधीस्थानी

त्यां नेऊनी ओतीतो ।। समाधी भरताची मग बाहेर येती ।। संपवितो कार्य ते येथिचे ।।१२३।। महाराज समाधिस्थ जहालियावर ।। प्रकाशानंद पहाती कारभार ।। परपरेमाजी त्या बापुचा अंगीकार ।। प्रकाशनंद करीती होऊनी ।।१२४।। गुरूमंत्र बापुशी देऊन ।। स्वरूपानंद ठेविले नामभिधान ।। सर्वचि कारभार तो पुढे येथुन ।। शिष्य हा अंगेचि पहातसे ।।१२५।। प्रकाशानंद समाधिस्थ जहालियावरी ।। बालानंद महाराज आले ते गादीवरी ।। परी कारभार हा स्वरूपानंदाचिये शिरी ।। येऊनीया पडलासे सर्वस्वे ।।१२६।। प्रकाशानंद  बालानंद यांचा अमल ।। जेम तेमचि राहीला सकळ ।।  उभयतामेहि संस्थान चालविले केवळ ।। नाम मात्रेचि सर्वहि ।।१२७।। बालानंद समाधिस्थ जहालीयावरी ।। स्वरूपानंदचि आले गादीवरी ।। आधिच कारभार होता तो दर्वशीरीं ।। आता तो आधिपतीत्व लाधले ।।१२८।। श्रोती सिंहावलोकनें करून ।। मागील पहावे ते अनुसंधान ।। की प्रकाशानंदानीं बापुस सांप्रदायी मिळून ।। घेतलेसे मंत्र देऊनी ।। १२९।। ऐसा आठव तो होता श्रोतया लागूनी ।। साशंकित जहाले ते सर्वचि मनी ।।  म्हणती बापु हा कोठील कोण मठां येऊनी ।। कैसा केंव्हा तों राहीला ।।१३०।।  तरी ऐकावे आता सावधान जालन्यासमीपची खोरपडी नामें वस्ती लहान ।। त्यामाजी तात्याजी पाटील गुरूभक्त पूर्ण ।। वस्तीस असे येथीच्या ।।१३१।। आनंदीमाई तयाशी कांता ।। पवित्र श्रद्धाळू असती उभयतां ।। परी संतानाविण उदासीनता अंतरी वाटे दोघाच्या ।।१३२।। गुरूसेवेचि उभयता प्रीती ।। प्राण गेलीया शब्द न मोडीतो ।। नानाव्रते नवसादि ते करोतो ।। एकाग्र चित्तेची उभतां ।।१३३।। या परी क्रम नित्य चालता ।।

अंतर्वत्नी जहाली पतीव्रता ।। आनंद न समाये उभयताचे चित्ता ।। प्रेम भरेचि बोलती ।।१३४।। जरीका जहालीया पुत्ररत्न ।। गुरू रंगनाथा करू तो अर्पण ।। वाचा दत्त होती मना पासून ।। महाराज सर्व हे जाणिता ।।१३५।। यथा समयी पुत्र लाभ होताचि जाण ।। आनंदले उभयताचे मन ।। गुरूकृपाही म्हणताचि दत्त म्हणून ।। महाराज ठाकति सामोरा ।।१३६।। गहीवरले उभयताचे मन ।। महाराज चरणी ते घेती लोळण ।। महाराज म्हणती उठा पाटील काही ते द्रव्य घेऊन ।। तुमचा पुत्र तो देऊ तुम्हाशी ।।१३७।। त्यामाजी म्हणती नाही नाही ।। बोलु नका महाराज असे काही एकदा वस्तु शिवार्पण केलीया पाही ।। घेऊ नयेचि त्या माघारा ।।१३८।। पुत्राशी मग त्या पाहिले तिक्षून ।। बापु ऐसे ते ठेविले नामाभिधान ।। पुढे पांच सहा वर्षे पालन पोषण ।। करूनीया पोहचविला मठी त्या ।।१३९।। गुरू सानिध्य लाभले बापुशीं ।। सेवा घडली ती अहर्निशी ।। वाव न मिळेची त्या शिक्षणासी ।। परी व्यवहार दक्षता आलीसे ।।१४०।। असो बुद्धि चातुर्य कौशल्यादि गुण ।। तैशीच शरीर संपत्ती लाभलीसे पूर्ण ।। सर्व सामर्थ्याचा व्यय तो संस्थाना कारण ।। स्वरूपानंद करिती प्रीतीने ।।१४१।। सभा मंडपादि बांधकाम पूर्ण ।। स्वरूपानंद महाराजानीच केले ते कष्ट साहून ।। यंत्र सामग्री ती आधुनिक आणून ।। कृषि व्यवसाय तो वाढविला ।।१४२।। एवढे संस्थान भरभराटीस आले ।। यासी कारण स्वरूपानंदचि जहाले ।। ऐसे असुनिया ते व्यवहार सगळे ।। आभिमान रहित चालती ।।१४३।। व्यवहार दृष्ट्या जरी कांही विपरीत ।। दिसले तरी ते न आणावे मनांत ।। करूनीया सर्वदा शुद्ध चित्त ।। हसक्षीर न्यायेचि

वर्तावे ।।१४४।। अहं अभिमान जयाचा गेला ।। जन्म मरण बाधा न होय त्याला ।। ऐशा या प्रसिद्ध शास्त्रोक्तिला ।। स्वरूपानंदची असति पात्र ते ।।१४५।। असो श्रीहरी कृपे पुढ येथून ।। ऐशेचि चालावे उत्सवादि पूर्ण ।। नेंमियेल्या कार्या ते कधी खंडण ।। पढु नयेचि सर्वथा ।।१४६।। ज्या श्रीहरीच्या कृपे करून ।। आत्मानंद चरित्र ते जहाले पूर्ण ।। त्या श्रीहरी चरणी माथा ठेऊन ।। ग्रंथ येथेचि संपविला ।।१४७।। आता सांगेन अवतर्णीका ।। चित्त देऊनी ती आईका ।। प्रथमाध्यायीं मंगलाचरण कुलव्रतांत पवित्र देखा ।। सविस्तर वर्णन केलासे ।।१४८।। आणिक महाराजाचे जन्म कथन ।। देवि चमत्कार बाललीलेमाजी दाऊन ।। मौन्जी बंधनादि दुसऱ्याध्यायीं पूर्ण ।। दत्त दर्शन साधुशी करविले ।।१४९।। तैसेची निर्गुणशहाचे निधन ।। परमहंस बाणा तो स्वीकारून ।। तीसऱ्यामध्ये गृहत्याग न सांगताचि जाण ।। केला असे तो सहजचि ।।१५०।। पुढती राजूर पैठणादि क्षेत्रे हींडून ।। मध्येच सहजानंद यतीचा अनुग्रह ।। होऊन ।। आत्मानंद सरस्वती म्हणून ।। कृपाहस्त मस्तकी ठेविला ।।१५१।। चवथ्यामाजी माईस सन्मार्गी लाविले ।। जगाचीं माई तीज करूनी सोडीले ।। टेंभूर्णी देऊळगांवी त्या मठा स्थापिले ।। येऊनी राहीले न्हाव्याशी ।। विश्रांती मठ स्थापून ।। पांचवा अध्याय केलासे पूर्ण ।। सहासात अध्यायीं ते देवी चमत्कार वर्णन ।। समस्ता लागी कथीयेले ।।१५३।। सदानंद महाराज माईस मुक्ति देऊन ।। मागुती केले महा प्रयाण ।। यापरी सविस्तर हाता वर्णन ।। अवतर्णीका येथेचि संपविली ।।१५४।। संत चरित्रे असती गहन ।। परी वदविता असे त्या रूक्मिणीरमण ।। वासुदेव त्यां सर्वथा निमित्त

पूर्ण ।। दासानुदास तुमचा ।।१५५।।

इति श्री आत्मानंद चरीत्रसार ।। सप्तमोध्याय:

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।। हरयेनम: ।। हरयेनम: ।।

।।७।। ।।७।। ।।७।। ।।७।। ।।७।।